दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१२२ | बुधवार दि.२२ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### उपोषणावर लाठी, प्रश्नांवर सरकारचे मौन!

लोकशाहीत आंदोलन गुन्हा नसतो; ते सत्तेला विचारलेला प्रश्न असतो. पण प्रश्न विचारणाऱ्यांवर लाठी चालते आणि प्रश्न मात्र अनुत्तरित राहतात, तेव्हा चिंता केवळ एका आंदोलनाची राहत नाहीती लोकशाहीच्या आरोग्याची बनते.दिल्लीत सोमवारी विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान घडलेल्या घटनांनी पुन्हा एकदा हा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. उपोषण करणाऱ्या आणि शांततापूर्ण पद्धतीने मोर्चा काढणाऱ्या आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी कारवाई केल्याच्या आरोपांमुळे सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# शेतकरी कर्जमाफीची यादी आज जाहीर होणार!

## ३० जुलैपूर्वी खात्यात पैसे जमा, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्य सरकारच्या शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत लाभार्थींची प्राथमिक यादी आज बुधवारी (२२ जुलै) जाहीर करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच, ३० जुलैपूर्वी पुर्वी खात्यात पैसे जमा करण्यात येतील असे ते म्हणाले.**




एका वृत्तवाहिनीशी बोलताना दत्तात्रय भरणे म्हणाले की, कर्जमाफीला विलंब होण्यामागे काही तांत्रिक आणि प्रशासकीय कारणे होती. सुरुवातीला ३० जूनपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्याचे उद्दिष्ट होते. मात्र, पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांना राज्यपालांची मंजुरी मिळणे आवश्यक होते. त्यानंतर आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांची अंतिम माहिती केंद्र सरकारकडून मिळणेही गरजेचे होते. आता हा डेटा सरकारकडे प्राप्त झाला असून प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. कृषिमंत्र्यांनी सांगितले की, २२ जुलै रोजी अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त प्राथमिक लाभार्थी यादी जाहीर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात रक्कम वर्ग केली जाईल. भरणे म्हणाले की, आयकर भरणाऱ्या मोठ्या शेतकऱ्यांची माहिती उपलब्ध नसल्यामुळे यादी अंतिम करण्यात अडचणी येत होत्या. एखाद्या अपात्र शेतकऱ्याला लाभ देऊन नंतर तो थांबवण्यापेक्षा सुरुवातीपासूनच पात्र लाभार्थींची अचूक यादी तयार करण्यावर सरकारने भर दिला. आता केंद्र सरकारकडून आवश्यक माहिती मिळाल्यामुळे कर्जमाफीच्या अंमलबजावणीतील सर्व प्रमुख अडथळे ▶▶ पान २ वर

# पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर राहुल गांधींसह खासदारांचे आंदोलन

## पंतप्रधान मोदी आणि शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

दिल्ली । वृत्तसंस्था

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि प्रियांका गांधी यांच्यासह काँग्रेस नेत्यांनी मंगळवारी (दि.२१) पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी निवासस्थानापर्यंत मोर्चा काढून आंदोलन केले.**



याबाबत एक्सवर ट्वीट करत राहुल गांधी यांनी सांगितले की, ''तरुण विद्यार्थ्यांवर झालेल्या अत्याचारांबद्दल पंतप्रधान मोदींकडून उत्तर मागण्यासाठी आम्ही त्यांच्या निवासस्थानी मोर्चा काढला. सरकारला कोणतीही जबाबदारी घ्यायची नाही किंवा यावर चर्चा करायची नाही.'' असेही ते म्हणाले. पुढे त्यांनी पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. भारताच्या तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त केल्याबद्दल पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनी राजीनामा दिलाच पाहिजे, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली. राहुल आणि प्रियांका गांधी यांनी सीजेपीच्या नेतृत्वाखाली आंदोलनादरम्यान पोलिस कारवाईत जखमी झालेल्या आणि राम मनोहर लोहिया रुग्णालयात दाखल केलेल्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. तसेच रुग्णालयात व्हेंटीलेटर असलेल्या एका जखमी तरुणीच्या आईचीही भेट घेतली. पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर उपस्थित काँग्रेसच्या नेत्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. यावेळी पोलिसांनी काँग्रेस खासदार चरणजीत सिंग चन्नी, खासदार डी.के. सुरेश आणि कन्हैया कुमार यांच्यासह काँग्रेस नेत्यांना ताब्यात घेतले. यावेळी हा भाजपचा दहशतवाद असून ते विद्यार्थ्यांचे ऐकत नाहीत, असे दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर चन्नी म्हणाले. तर पोलिस काँग्रेस कार्यकर्त्यांना क्रूरपणे ताब्यात घेत आहेत, अशी टीका खासदार सुरेश यांनी केली. ▶▶ पान २ वर



## प्रकाश आंबेडकरांची उद्या 'महाराष्ट्र बंद'ची हाक!

मुंबई । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी २३ जुलै रोजी 'महाराष्ट्र बंद'ची हाक दिली आहे. दिल्लीच्या जंतर-मंतर आणि संसद परिसरात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईचा निषेध करण्यासाठी हा बंद पुकारण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ आणि पोलिसांच्या कथित ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### देणगी चोरीनंतर राम मंदिर ट्रस्टच्या कामकाजात बदल

अयोध्याः श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने देणगी चोरीच्या प्रकरणानंतर आपल्या कार्यपद्धतीत अधिक पारदर्शकता आणण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला आहे. आता ट्रस्ट दर महिन्याचा ऑडिट रिपोर्ट आपल्या अधिकृत वेबसाइटवर सार्वजनिक करणार आहे. त्यामुळे देश-विदेशातील कोट्यवधी रामभक्तांना मंदिराचे उत्पन्न-खर्च आणि ट्रस्टच्या विविध कामकाजाची माहिती थेट पाहता येणार आहे. यासोबतच वेबसाइटवर ट्रस्टचे प्रशासकीय निर्णय, मंदिर बांधकामाची प्रगती आणि इतर महत्त्वाच्या घडामोडींची माहितीही नियमितपणे अपडेट केली जाणार आहे. आतापर्यंत ट्रस्टचे आर्थिक ऑडिट आर्थिक वर्ष संपल्यानंतर वर्षातून केवळ एकदाच केले जात होते. हा अहवाल ट्रस्टच्या बैठकीत विश्वस्तांसमोर सादर केला जात होता; मात्र तो सर्वसामान्य भाविकांसाठी उपलब्ध नव्हता. नवीन व्यवस्था लागू झाल्यानंतर दर महिन्याचे उत्पन्न, खर्च, देणग्या आणि आर्थिक स्थितीचा तपशील वेबसाइटवर सार्वजनिक केला जाणार आहे. त्यामुळे ट्रस्टच्या आर्थिक व्यवस्थापनात पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा आहे.

### राज्यातील तीन प्रमुख तीर्थक्षेत्रांसाठी ११५ कोटी

मुंबईः परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील संत जनाबाई तीर्थक्षेत्रासाठी ४८.५५ कोटी, अमरावती येथील श्री संत गाडगेबाबा समाधीस्थळासाठी २५ कोटी आणि नागपूर जिल्ह्यातील काटोल येथील श्री चक्रधर स्वामी मंदिर परिसरसाठी ४१.७५ कोटी या तीन तीर्थक्षेत्रांच्या सुधारित विकास आराखड्यांना एकूण ११५ कोटींच्या विकासकामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. आराखड्यातील सर्व कामे उत्सव काळातील भाविकांची संख्या लक्षात घेऊन दर्जेदार पद्धतीने व टप्प्याटप्प्याने निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी फडणवीस यांनी दिले.

### ब्रिटिशकालीन अत्याचारांपेक्षा अधिक पटीने अत्याचार

दिल्लीः दिल्लीतील जंतर-मंतरवर गेल्या दोन आठवड्यांपासून आपल्या हक्कासाठी आणि भविष्यासाठी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या तरुण-तरुणींवर तसेच सोनम वांगचुक यांच्यावर झालेल्या कारवाईवरून आदित्य ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. दिल्लीतील परिस्थितीवर बोलताना आदित्य ठाकरे यांनी भूतकाळातील घटनांचा दाखला देत सध्याच्या सत्ताधाऱ्यांच्या अहंकारावर निशाणा साधला. विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या बळाच्या वापरावरून आदित्य ठाकरे यांनी अत्यंत संतप्त सवाल उपस्थित केले. ''शाळेतील लहान मुले आपल्या भवितव्यासाठी रस्त्यावर उतरली होती. त्या निष्पाप विद्यार्थ्यांना कानाखाली मारले गेले, महिला आंदोलकांना अमानुषपणे मारहाण करण्यात आली. पोलिसांच्या कारवाईत सहभागी असलेल्या रॅपिड ॲक्शन फोर्सने स्वतःच्या नावाच्या पाट्यासुद्धा काढून टाकल्या होत्या. आपल्याच देशातील भारतीय नागरिकांवर आणि मुलांवर असा अमानुष लाठीचार्ज करताना सरकारला कसलीच संवेदनशीलता उरलेली नाही का?'' असा संतप्त सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.

## अजित स्मृती अविट स्मृती' प्रदर्शनातून स्व.अजितदादांच्या जीवनप्रवासाला उजाळा

### मुख्यमंत्री फडणवीसांकडून कार्याला अभिवादन



मुंबई प्रतिनिधी

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या ६७ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'अजित स्मृती अविट स्मृती' या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवारी उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी, ''या प्रदर्शनातून अजितदादांचा संपूर्ण जीवनप्रवास, त्यांचे कार्यकर्तृत्व आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावीपणे उलगडले असून, त्यांच्या स्मृती कायम जनमानसात जिवंत राहतील,'' असे गौरवोद्गार काढले.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सभागृहात आयोजित या प्रदर्शनात अजितदादा पवार यांच्या बालपणापासून सार्वजनिक जीवनातील विविध टप्पे, सामाजिक कार्य, राजकीय कारकीर्द, विकासकामे, शेतकरी आणि सर्वसामान्यांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते तसेच त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील अनेक दुर्मिळ क्षण छायाचित्रांच्या माध्यमातून ▶▶ पान २ वर


# आता मारू नका, रक्ताचा थेंबही उरला नाही!

## पोलिसांच्या अमानुष लाठीमारामध्ये रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तरूणांची आर्त हाक

फोकस...

बीड । विशेष प्रतिनिधी

देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतील ऐतिहासिक जंतर-मंतर मैदानावर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी जमा झालेल्या हजारो विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. शिक्षण व्यवस्थेतील अनागोंदी कारभार, पेपरफुटी आणि विविध गैरव्यवहारांच्या विरोधात शांततापूर्ण मार्गाने न्याय मागणाऱ्या विद्यार्थ्यांवर प्रशासनाने केलेल्या क्रूर लाठीचार्जमुळे संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली आहे. या आंदोलनादरम्यान अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना बेदम मारहाण करण्यात आली. पोलिसांच्या अमानुष लाठीमारामध्ये अनेक तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडले. ''आता आणखी मारू नका,



अंगात रक्तच शिल्लक राहिले नाही,'' अशी आर्त हाक फोडत असतानाही सुरक्षा यंत्रणांनी नरमला नाही, ▶▶ पान २ वर

**दिल्लीतील जंतर-मंतरवर शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात उतरलेल्या विद्यार्थ्यांवर पोलिसांचा क्रूर लाठीचार्ज; अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी गंभीर जखमी. शिक्षण क्षेत्रातील बदलावासाठी आणि आपल्या मागण्यासाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाटी हल्ला दगडफेक म्हणजेच देशात हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू असल्याचा तीव्र संताप देशभरातून व्यक्त केला जात आहे.**

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८८.०० क्विंटल | २,१७५ | २,७९९ | २,६११ |
| ज्वारी/हायब्रिड : ५१.०० क्विंटल | २,३०० | ४,८१० | ३,१६२ |
| मका/लोकल: २१.०० क्विंटल | २,२९० | २,२९० | २,२९० |
| तूर : १७.०० क्विंटल | ७,५९१ | ७,८९९ | ७,७४५ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ४४.०० क्विंटल | २,५१० | २,७७५ | २,६८२ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,३६० | ५,३६० | ५,३६० |



## अग्रलेख

# उपोषणावर लाठी, प्रश्नांवर सरकारचे मौन!

लोकशाहीत आंदोलन गुन्हा नसतो; ते सत्तेला विचारलेला प्रश्न असतो. पण प्रश्न विचारणाऱ्यांवर लाठी चालते आणि प्रश्न मात्र अनुत्तरित राहतात, तेव्हा चिंता केवळ एका आंदोलनाची राहत नाहीती लोकशाहीच्या आरोग्याची बनते.

दिल्लीत सोमवारी विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान घडलेल्या घटनांनी पुन्हा एकदा हा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. उपोषण करणाऱ्या आणि शांततापूर्ण पद्धतीने मोर्चा काढणाऱ्या आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी कारवाई केल्याच्या आरोपांमुळे सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या मागण्या योग्य की अयोग्य, हा वेगळा विषय असू शकतो; परंतु त्यांच्याशी संवाद साधण्याऐवजी आंदोलन मोडून काढण्याची प्रतिमा निर्माण होत असेल, तर ती कोणत्याही लोकशाहीसाठी चांगली नाही. भारतात आंदोलनांची समृद्ध परंपरा आहे. महात्मा गांधींचे सत्याग्रह, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक आंदोलन, जयप्रकाश नारायणांची 'संपूर्ण क्रांती', अण्णा हजारे यांचे उपोषण, शेतकरी आंदोलने, विद्यार्थ्यांच्या चळवळीया सर्वांनी सरकारांना विचार करायला भाग पाडले. प्रत्येक मागणी मान्य झाली असे नाही; परंतु संवादाची दारे पूर्णपणे बंद झाली नव्हती. आज परिस्थिती वेगळी असल्याची भावना समाजात वाढताना दिसते. आंदोलन सुरू झाले की त्याकडे अनेकदा कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नातून पाहिले जाते. आंदोलनकर्त्यांशी चर्चा करण्यापेक्षा त्यांना हटविणे, मोर्चे रोखणे किंवा पोलिस कारवाई करणे हा पर्याय अधिक दिसू लागला आहे, अशी टीका विरोधक आणि अनेक सामाजिक कार्यकर्ते करत आहेत. सरकार मात्र कायदा-सुव्यवस्था राखणे ही आपली जबाबदारी असल्याचे सांगते. दिल्लीतील या घटनेनंतर हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे. उपोषणकर्त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी सरकारकडून तातडीचा संवाद झाला का? आंदोलन इतक्या टोकाला जाण्याची वेळ का आली? शांततापूर्ण आंदोलनांना उत्तर म्हणून पोलिस कारवाई हा पहिला पर्याय असावा का? या प्रश्नांची उत्तरे सरकारने स्पष्टपणे देणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावरील राजकीय जबाबदारीचाही मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध वाद, परीक्षा व्यवस्थेवरील प्रश्न आणि विद्यार्थ्यांच्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर विरोधक त्यांच्यावर सातत्याने टीका करत आहेत. सरकार मात्र धोरणात्मक सुधारणा सुरू असल्याचे सांगत त्यांच्यावर विश्वास कायम ठेवत आहे. ही भूमिका राजकीयदृष्ट्या योग्य की अयोग्य, यावर मतभेद असू शकतात; पण लोकशाहीत उत्तरदायित्वाचा प्रश्न टाळता येत नाही. लोकशाही म्हणजे प्रत्येक आंदोलनासमोर सरकारने तात्काळ झुकावे, असा अर्थ नाही. त्याचप्रमाणे आंदोलन करणाऱ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करावे, असाही अर्थ नाही. शासनाची ताकद विरोधकांना गप्प बसवण्यात नसते; ती विरोधकांचे म्हणणे ऐकून,संवाद साधून आणि योग्य निर्णय घेण्यात असते. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार दिला आहे. हा अधिकार केवळ कायदेशीर नाही, तर लोकशाहीचा प्राण आहे. जर आंदोलन करणाऱ्यांना सरकार आपले ऐकणार नाही, अशी भावना निर्माण झाली, तर संस्थांवरील विश्वास ढासळतो. आणि विश्वास तुटला की लोकशाही कमकुवत होते.

आजचा प्रश्न केवळ दिल्लीतील एका आंदोलनाचा नाही. तो सरकार आणि नागरिक यांच्यातील संवादाच्या नात्याचा आहे. आंदोलनकर्त्यांना विरोधक म्हणून नव्हे, तर लोकशाहीतील भागीदार म्हणून पाहण्याची गरज आहे. कारण इतिहास सांगतोभारतामध्ये अनेक संघर्ष रस्त्यावर सुरू झाले, पण ते संवादाच्या टेबलावरच संपले. सरकारने कायदा-सुव्यवस्था राखावीच; पण त्याच वेळी संवेदनशीलताही दाखवावी. आंदोलनकर्त्यांनीही शांततेचा मार्ग सोडू नये. लोकशाहीत विजय कोणाचा होतो, यापेक्षा संवाद टिकतो का, हे अधिक महत्त्वाचे असते. कालच्या दिल्लीतील घटनांनी एक प्रश्न मात्र पुन्हा विचारायला भाग पाडले आहेसरकार आंदोलकांना ऐकण्यापेक्षा त्यांना हटविण्यात अधिक व्यस्त होत आहे का.?

---

### जालना पीपल्स बँकेत एटीएम व यूपीआय सुविधेचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते लोकार्पण

# आर्थिक स्तंभ अशी जेपीसी बँकेची ओळख-अशीमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी**

**शतकाहून अधिक काळाची विश्वासाची परंपरा असलेल्या 'दि जालना पिपल्स को-ऑप. बँक लि., जालना' च्या माध्यमातून ग्राहकांसाठी आता अत्याधुनिक एटीएम व यूपीआय या आधुनिक डिजिटल सुविधेचे लोकार्पण मंगळवार दि. २१ जुलै रोजी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या हस्ते करण्यात आले.**




यावेळी बँकेचे चेअरमन सतिश पंच, व्हाईस चेअरमन किशोर देविदान, संचालक संजय मुथा, संजय भरतीया, सुनील चौधरी, सौ. सुनंदा अग्रवाल, अॅड. अनिल संचेती, राजकुमार दायमा, हितेंद्र शाह, अभय करवा, जयेश बाविशी, अनुराग अग्रवाल, सुनील बियाणी, सौ. वर्षा भक्कड, सुभाष वाघमारे, दिपक भुरेवाल, तज्ञ संचालक सीए निखिल बाहेती, महाव्यवस्थापक विजय जोशी, व्यवस्थापक विलास जाधव आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी अशीमा मित्तल म्हणाल्या की, जालन्याचा आर्थिक स्तंभ अशी जालना पीपल्स बँकेची ओळख आहे. शहराच्या विकासात ही बँक महत्त्वाची भूमिका पार पाडत असून, प्रतिष्ठा आणि एनपीए अतिशय उत्तम आहे. या बँकेची मराठवाड्यात एकमेव महिला शाखा असल्याचा आपणास सार्थ अभिमान आहे. मराठवाड्यात महिलांचे आर्थिक स्टेटस म्हणावे तसे नाही. मात्र पीपल्स बँकेच्या प्रयत्नामुळे ते निश्चितच उंचावेल. कारण, महिला या संधीचा पुरेपूर वापर करून पुढे जात असतात. स्वतंत्र महिला बँकेमध्ये महिलांमध्ये आर्थिक साक्षरता प्रगल्भ होत असल्याचे सांगून, सरकार डिजिटल ट्रांजेक्शनला प्रोत्साहन देत आहे. या बँकेने एटीएम आणि यूपीआय या त्या दोन्ही सुविधा दिल्याने शासनाचा उद्देश साध्य होत आहे. रोख व्यवहार कमी होऊन जनता डिझेल ट्रांजेक्शनकडे वळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. चेअरमन सतीश पंच यांनी आगामी काळात बँकिंग कामकाजात एआयचा वापर करण्याचे सांगितले आहे यावरूनच त्यांची दूरदृष्टी प्रोग्रेसिव असल्याचे दिसून येत आहे असे त्या म्हणाल्या आणि बँकेच्या प्रगतीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. प्रस्ताविकपर भाषणात चेअरमन सतीश पंच म्हणाले की, जालना पीपल्स बँक ही बँक १०९ वर्षे जुनी आहे. जालना ही एक मोठी उद्योग नगरी आहे आणि जालनाच्या उद्योग नगरीच्या वाढत्या प्रगतीमध्ये जेपीसी बँकेचा मोठा वाटा आहे. येथील लोकांचा बँकेवर मोठा विश्वास असून बँकेच्या सभासदांची संख्या १९ हजार पेक्षा जास्त आहे. मराठवाड्यात एकमेव जालना शहरात महिला बँक देखील आहे, ज्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आगामी काळात लवकरच कामकाजात एआयचा वापर वाढविला जाणार आहे. आज लोकार्पण झालेल्या एटीएम सुविधेमुळे ग्राहक दिवसाचे २४ तास आणि आठवड्याचे सातही दिवस रोख रक्कम काढू शकतात. एटीएमद्वारे बॅलन्स तपासणे, मिनी स्टेटमेंट मिळवणे आणि पिन बदलणे यासारख्या सुविधा सहज शक्य होतील. ही सेवा अत्यंत सुरक्षित असून, व्यवहार करताना ग्राहकांच्या गोपनीयतेची पूर्ण काळजी घेतली गेली आहे. यूपीआय सुविधेच्या माध्यमातून ग्राहक कोणत्याही खात्यात त्वरित पैसे पाठवू शकतात. दुकानांमध्ये क्यूआर कोड स्कॅन करून पैसे देणे आता अत्यंत सोपे झाले आहे. एकाच अॅपमध्ये अनेक बँकांची खाती लिंक करण्याची सुविधा उपलब्ध आहे, ज्यामुळे आर्थिक व्यवस्थापन सुलभ होते. बँकेच्या या नवीन डिजिटल क्रांतीमुळे ग्राहकांचा वेळ वाचणार असून बँकिंग अधिक सोपे व सुखकर होणार आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील बियाणी यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार व्हाईस चेअरमन किशोर देविदान यांनी मानले.

---

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये आज रक्तदान शिबीर

### 'रक्तदान महाअभियाना'त नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा-डॉ.योगेश क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत भाजपच्या 'रक्तदान महाअभियाना'त बीड येथील सौ.के.एस.के. महाविद्यालयात आज (दि.२२) सकाळी ११ वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.**



मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आज 'सेवा यज्ञाचा संकल्प' म्हणून साजरा केला जात आहे. भाजपच्यावतीने राज्यात 'रक्तदान महाअभियान' राबविण्याची घोषणा करण३यात आली आहे. गेल्यावर्षी प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, भाजप नेत्या ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात सेवा यज्ञाचा विक्रम केला असून जवळजवळ ७८ हजार रक्तदात्यांनी रक्तदान केले होते. यावर्षी हे उद्दिष्ट १ लाखांपेक्षा जास्त रक्तदाते असे आहे. त्यामुळे रक्तदानासाठी इच्छुकांनी सौ.के.एस.के. महाविद्यालयात आज (दि.२२) सकाळी ११ वाजता उपस्थित राहून या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

---

# वनीकरण विभागाचे घसिंगे व तिडके यांनी केला लाखो रुपयाचा भ्रष्टाचार?

**घनसावंगी । प्रतिनिधी**

**परिक्षेत्र सामाजिक वनिकरण कार्यालय घनसावंगी अंतर्गत कर्मचारी घुसिंगे व तिडके हे सामाजिक वनिकरण कार्यालय घनसावंगी येथे कार्यरंत झाल्यापासून सामाजिक वनिकरण विभागामार्फत शेतकरी यांच्या विकास कामांसाठी शेती विषयी**




बांधावरिल झाडे लावणे तुती लागवड करणे रोडवरिल दुभाग झाडे लावणे असे विविध प्रकारचे वृक्ष लागवड केली जात आहे पण सामाजिक वनिकरण कार्यालय घनसावंगी हया कार्यालयाची कामे चावाठयावर येऊन ठेपली आहे या कार्यालयामध्ये सी ,सी, टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत आज रोजी शोभेची वस्तु म्हणून बघीतल्या जात आहे कितीतरी शेतकरी दररोज आपल्या स्त,हाच्या कामासाठी परेशन आहेत कर्मचारी भेटत नाही व फोन उचलत नाही घसिंगे व तिडके यांनी आपल्या स्त,हाच्य स्वथासाठी शासनाची व शेतकरी यांची फसवणूक केली आहे लाखों रुपयांचा भष्टाचार केला आहे या अनुषंगाने मानवी हक्क अभियान जालना जिल्हा अध्यक्ष अंकुश सोनवणे यांनी तालुका दंडाधिकारी तहसिल कार्यालय घनसावंगी यांना निवेदन देऊन सर्व माहिती सांगितली आहे तसेच कर्मचारी घुसिंगे व तिडके यांनी सगनमत करून कागदपत्री बीले काढली आहेत यांच्या कामाची चौकशी करून शासन स्तरावरून निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी तसेच विगागिय आयुक्त छत्रपती संभाजी नगर व जिल्हाधिकारी कार्यालय जालना आणि वनिझेत्र सामाजिक वनिकरण जिल्हा कार्यालय जालना यांना निवेदन देण्यात येणार आहे योग्य कार्यवाही नाही झाल्यास मानवी हक्क अभियान या संघटनेच्या वतीने बे मुदत अमरण उपोषण केले जाईल शासनानी यांची गांभीर्याने नोंद घ्यावी.

---

## पान १ वरून...

### शेतकरी कर्जमाफीची यादी

दूर झाले आहेत. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत कृषीमंत्र्यांनी स्पष्ट केले की, ३० जुलैपूर्वी पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बोगस आणि निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांविरोधात सुरू असलेल्या कारवाईचीही माहिती दिली. खरीप हंगामात बियाण्यांच्या उगवण क्षमतेबाबत राज्यभरातून ११,५८४ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यापैकी ८,१९२ प्रकरणांची तपासणी करण्यात आली असून ७,४२२ नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले. या तपासणीत ७६३ नमुने निकृष्ट किंवा अमान्य आढळले असून संबंधित ८१ कंपन्यांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. दोषी कंपन्यांवर कठोर कायदेशीर कारवाई सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सोयाबीन बियाण्यांच्या उगवण क्षमतेबाबत सर्वाधिक तक्रारी अकोला, अमरावती, बुलढाणा आणि यवतमाळ या जिल्ह्यांतून प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरणांमुळे १ लाख ६३ हजार ८५१ हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र प्रभावित झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. राज्य सरकारकडून कर्जमाफीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याबरोबरच निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई सुरू असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

----------

### प्रकाश आंबेडकरांची उद्या

दडपशाहीविरोधात सर्व समविचारी पक्ष, विद्यार्थी, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी एकत्र यावे, असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. त्यामुळे दिल्लीतील आंदोलनाची धग आता महाराष्ट्रातील शहरांपासून गावागावांपर्यंत पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दिल्लीतील आंदोलनाला आता प्रमुख विरोधी पक्षांच्या नेत्यांचंही समर्थन मिळत आहे. राहुल गांधी यांनी खासदारांसह विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून सरकारवर दबाव वाढवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही जंतर-मंतरवर पोहोचून आंदोलक विद्यार्थ्यांशी चर्चा केली. त्यांनी आंदोलकांकडून संपूर्ण परिस्थिती जाणून घेतली आणि पोलिस कारवाईबाबत चिंता व्यक्त केली. यावेळी त्यांनी आंदोलनाचे प्रमुख अभिजीत दिपके यांच्याशीही चर्चा केली. आंदोलनकर्त्यांवर झालेल्या कारवाईचे पडसाद आता थेट महाराष्ट्राच्या राजकारणात उमटले असून, विरोधकांनी केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी या आंदोलनाला पाठिंबा दिल्यानंतर आता ते दिल्लीतील आंदोलनस्थळी जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून सुरू असलेल्या या लढ्याला महाराष्ट्रातूनही ताकद देण्याची भूमिका ठाकरे यांनी घेतली आहे. यापूर्वीच त्यांनी पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न हा केवळ राजकीय मुद्दा नसून देशाच्या तरुणाईच्या भविष्याशी संबंधित असल्याचे म्हटले होते. दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये विद्यार्थी, युवक आणि विविध सामाजिक संघटनांनी निदर्शने केली आहेत. मुंबईतही आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली. आता प्रकाश आंबेडकरांनी दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेमुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

-------------

### पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर राहुल

तर काँग्रेस पक्षाने एक्सवर ट्वीट करत सांगितले की, ''आज देशातील विद्यार्थ्यांचे भविष्य पायदळी तुडवले जात आहे आणि आवाज उठवणाऱ्यांवर लाठ्यांचा वर्षाव केला जात आहे, ज्यासाठी नरेंद्र मोदींनी माफी मागावी. विद्यार्थ्यांची मागणी अगदी स्पष्ट आहे. सरकारने पेपरफुटीची जबाबदारी घ्यावी आणि धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा,'' असे पक्षाने म्हटले आहे. नीट-यूजी पेपरफुटीसह वारंवार होणाऱ्या परीक्षांमधील अनियमिततेवरून धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत, सीजेपीचे हजारो आंदोलक आणि विद्यार्थ्यांनी जंतर मंतरपासून संसदेकडे मोर्चा काढल्यानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांच्यावर लाठीचार्ज केला. त्यामुळे संसदेच्या पावसाळी अधिवेशनात त्याचे पडसाद उमटले.

**राहुल गांधींना पोलिसांची मारहाण ? नाकातून रक्तस्त्राव!**

आंदोलनादरम्यान राहुल गांधी यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर काँग्रेसने सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका छायाचित्रामुळे नव्या चर्चेला तोंड फुटले आहे. काँग्रेसने अधिकृत सोशल मीडिया खात्यावर राहुल गांधी यांचा एक फोटो पोस्ट केला. या छायाचित्रात त्यांच्या नाकाजवळ रक्त दिसत आहे. हा फोटो समोर आल्यानंतर राहुल गांधींना ताब्यात घेताना पोलिसांकडून मारहाण झाली का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. मात्र, राहुल गांधी यांच्या नाकातून रक्त का आले किंवा त्यामागचे नेमके कारण काय, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती उशिरापर्यंत समोर आली नाही.

**लाठीचार्ज प्रकरणी मोदी यांनी माफी मागावी**

राहुल गांधी यांनी सोमवारी कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागावी अशी मागणी केली. त्यांनी या कृत्याला 'अभारतीय' म्हटले आहे. पत्रकारांशी बोलताना, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी संतप्त दिसले आणि त्यांनी या प्रकरणी पंतप्रधान मोदींच्या मौनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ''जे काही घडत आहे, लोकांना मारहाण केली जात आहे, ते पूर्णपणे अभारतीय आहे. आंदोलनात जे घडले त्यासाठी मोदींनी माफीसुद्धा मागितलेली नाही,'' असे ते म्हणाले.

**सरकारच मानसिक रुग्ण - राज ठाकरे**

दिल्लीतील जंतर-मंतर येथील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करत त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली असून सरकारने आंदोलकांशी संवाद साधण्याचे आवाहन केले आहे. राज ठाकरे यांनी सोशल मीडियावरील सविस्तर पोस्टमधून आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी म्हटले की, सोनम वांगचुक यांना रुग्णालयात दाखल करण्याची पद्धत आणि त्यानंतर आंदोलनकर्त्यांवर झालेला लाठीचार्ज पाहता सरकारचा दृष्टिकोन चिंताजनक वाटतो. आंदोलने दडपण्याऐवजी ती समजून घेऊन संवादातून मार्ग काढणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

**दोन्ही सभागृहाचे कामकाज स्थगित**

सोमवारी पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी संसदेवर कॉकरोच जनता पार्टीने काढलेल्या मोर्चाचे पडसाद संसदेत उमटले. त्यातच विद्यार्थी आंदोलकांवर दिल्ली पोलिसांनी लाठीचार्ज केल्यामुळे संसदेत शिक्षण व्यवस्था आणि विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जबाबत चर्चा करण्याची मागणी विरोधकांनी संसदेच्या लोकसभा आणि राज्यसभेत केली. लोकसभेचे कामकाज वारंवार स्थगित करण्यात आले, कारण विरोधी पक्षांनी नीट पेपर 'लीक' आणि राम मंदिरातील कथित देणगी चोरी प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी करत घोषणाबाजी केली आणि फलक प्रदर्शित केले. जवळपास राज्यसभा पाच ते सहा वेळा तर लोकसभा ४ ते ५ वेळा विरोधकांच्या गोंधळामुळे स्थगित करावे लागले. नंतर मात्र दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

--------------

### आता मारू नका, रक्ताचा

असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या हिंसाचारात अनेक विद्यार्थ्यांच्या डोक्याला, हाताला व पायाला गंभीर दुखापती झाल्या आहेत. न्याय मागणाऱ्या विद्यार्थ्यांच्या रक्ताने जंतर-मंतरची धूळ माखली आहे. शिक्षण मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा दिला पाहिजे, अन्यथा आंदोलन राज्यव्यापी केले जाईल असा इशारा विद्यार्थी संघटनेने दिला आहे. आता यावर शासन काय निर्णय घेते हे पहावे लागेल परंतु देशाच्या भविष्यासाठी आणि उत्तम शिक्षण व्यवस्थेसाठी न्याय मागणे हा जर गुन्हा ठरत असेल, तर अशा देशात विकासाच्या आणि प्रगतीच्या गप्पा मारणे कितपत योग्य आहे? असा संतप्त सवाल यावेळी विद्यार्थी व नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. केंद्रातील भारतीय जनता पक्षाचे सरकार आता लोकशाही मूल्यांची पायमल्ली करून थेट हुकूमशाहीच्या मार्गाने वाटचाल करत असल्याची तीव्र प्रतिक्रिया राजकीय व सामाजिक वर्तुळात उमटत आहे. देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्याची मागणी वारंवार करूनही सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. शांततापूर्ण आंदोलनाला दडपशाहीने उत्तर देणाऱ्या केंद्र सरकारच्या या भूमिकेमुळे तरुणाईमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला असून, येत्या काळात हा लढा आणखी तीव्र करण्याचा इशारा विविध विद्यार्थी संघटनांनी दिला आहे. जंतर-मंतरवर अनेक विद्यार्थ्यांवर पोलिसांकडून मोठ्या प्रमाणात लाठी हल्ला झाला यात अनेक विद्यार्थी जखमी झाली अगदी रक्तबमबाळ झालेले विद्यार्थी माध्यमासमोर येत होते अशा या पाहिलेल्या घटनेमधून आता विद्यार्थीच म्हणत आहेत. साहेब मारू नका, आता अंगात रक्तच राहिले नाही. किमान ही परिस्थिती पाहून केंद्र सरकार जागे होईल. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा होईल अशी आशा बाळगणे भाबडेपणा ठरू नये. आता तर पंतप्रधानांनी देखील राजीनामा द्यावा अशीही मागणी होत आहे. एवढ्या पूर्व पद्धतीने आंदोलन चिरडणे म्हणजे हे लोकशाहीसाठी घातक आणि हुकूमशाहीकडे वाटचाल असल्याचे विरोधकाकडून बोलले जात आहे.

------------

### अजित स्मृती अविट स्मृती' प्रदर्शनातून

साकारण्यात आले आहेत. प्रदर्शनाचे उद्घाटन केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''अजितदादांच्या जीवनातील प्रत्येक टप्पा या छायाचित्रांमधून जिवंत झाला आहे. त्यांच्या कार्याची व्याप्ती, निर्णयक्षम नेतृत्व आणि समाजासाठी केलेले योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविणारे हे प्रदर्शन आहे. दादांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाने हे प्रदर्शन आवर्जून पाहावे.'' यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.ङ्गङ्गप्रदर्शनात अजितदादा पवार यांच्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीतील महत्त्वपूर्ण क्षण, राज्याच्या विकासासाठी घेतलेले निर्णय, विविध क्षेत्रातील योगदान तसेच सहकाऱ्यांशी आणि नागरिकांशी असलेले आत्मीय संबंध यांचे दुर्मिळ छायाचित्रांद्वारे दर्शन घडविण्यात आले आहे. अनेक अभ्यागतांनी प्रदर्शनाला भेट देत दादांच्या आठवणींना उजाळा दिला. मुख्यमंत्र्यांनी प्रदर्शनाची पाहणी करत प्रत्येक छायाचित्रामागील आठवणी जाणून घेतल्या. त्यांनी प्रदर्शनाच्या संकल्पनेचे आणि मांडणीचेही कौतुक केले. या माध्यमातून अजितदादा पवार यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला आमदार शिवाजीराव गर्जे, सतीश चव्हाण, चंद्रदीप नरके, गोकुळ शिंदे, हिरामण खोसकर, माजी आमदार राजेश पाटील, गोकुळ संघाचे माजी अध्यक्ष अरुण डोंगरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याला आणि व्यक्तिमत्त्वाला अभिवादन करणारे हे छायाचित्र प्रदर्शन त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा प्रेरणादायी प्रवास अनुभवण्याची संधी उपलब्ध करून देत असून, राज्यभरातील कार्यकर्ते आणि नागरिकांकडून प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. २२ जुलै २०२६



## थोडक्यात



### वारकरी समूह दिंडी नृत्य स्पर्धेत यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

वसुंधरा प्रतिष्ठान अंबाजोगाईच्या वतीने अश्व रिंगण सोहळ्यानिमित्त योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या मैदानावर झालेल्या वारकरी समूह दिंडी नृत्य स्पर्धेत कै.दे.बा.गणगे यो.नू.प्रा.विद्यालय (स्वा.रा.ती.रुग्णालय परिसर) च्या इ.१ ली ते ४ थी गटामध्ये द्वितीय तर इ. ५ वी ते ७ वी गटामध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला. या यशाबद्दल सहभागी विद्यार्थी, मुख्याध्यापक,विभाग प्रमुख,मार्गदर्शक शिक्षक आदींचे अभिनंदन होत आहे.

### वंजारवाडी येथील तलाव दुरुस्ती व पाटबंधारेचे काम लवकरच –केशव तांदळे

बीड । प्रतिनिधी

अनेक दिवसापासून वंजारवाडी तलावाची व उजव्या कालवा / पाटाची दुरुस्ती व्हावी अशी शेतकऱ्यांची मागणी होती . तसेच शेतीसाठी पाणीपुरवठा हवा यासाठी अनेक वर्षाची प्रलंबित मागणी पूर्ण होत आहे या कामाला लवकरच प्रत्यक्ष सुरुवात होऊन शेतकऱ्याचे जीवनमान बदलण्यास मदत होईल असे केशव तांदळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या अपंगात म्हटले आहे



हे काम पूर्ण झाल्यास वंजारवाडी – तिप्पटवाडी – मुर्शदपुर रुईलिंबा –लिंबारुई – शहाजनपूर – पिंपरगव्हाण तसेच नवगण राजुरी जिल्हा परिषद सर्कल व परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या जिरायती शेतीचे रूपांतर बागायती शेतीत होत आहे . त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनात वाढ होईल . ही मागणी माजी उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार साहेब , विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब , जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब व माजी मंत्री धनंजयजी मुंडे साहेब यांच्या प्रयत्नातून या कामास मंजुरी मिळाली होती . त्यावर बजेट पडले व आज त्या कामास टेंडर खुले झाले आहे . लवकरच हे काम सुरू होऊन पूर्णत्वास जाईल व अनेक वर्षापासून शेतकऱ्यांची असलेली प्रलंबित मागणी पूर्ण होत आहे . याचा मनस्वी आनंद होत आहे...दिवंगत नेते माजी उपमुख्यमंत्री स्व.अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त... त्यांना शेतकऱ्यांच्या वतीने हीच आदरांजली ठरेल असे मत सामाजिक कार्यकर्ते केशव तांदळे यांनी व्यक्त केले.

### घरात घुसून बलात्कार केल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता

#### माजलगाव अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निकाल

माजलगाव । प्रतिनिधी

फिर्यादीचे सासू सासरे दिर सर्व जण मजुरी कामास बाहेर गेले असता फिर्यादी व तिचा लहान दिर घरी होते. दि ०५ मे २०१६ रोजी दुपारी ३:०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादीचा लहान दिर बाहेर खेळण्यास गेला असता आरोपी अशोक बालासाहेब आवाड हा फिर्यादीच्या घरी आला व त्याने वाईट हेतूने फिर्यादीचे घरात घुसून फिर्यादीचा विनयभंग व बलात्कार केल्याच्या आरोपाची फिर्याद देण्यात आली त्यानुसार पोलीस स्टेशन वडवणी येथे गु. र. नं. ५०/२०१६ अन्वये कलम ३५४(अ),(१),व ३७६(२)(एच)४५२ भादंवी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.



प्रकरणात चौकशीअंती पोलिसांनी आरोपी विरोधात मा.न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये बचाव पक्षांकडून ॲड.एस.के.गोंडे यांनी आरोपीची बाजू प्रभावीपणे मांडली सबळ पुराव्या अभावी आरोपीची अतिरिक्त सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.आरोपीतर्फे ॲड.एस.के.गोंडे यांनी काम पाहिले त्यांना ॲड.एन.एस.तेलगड व ॲड. डी.बी.कोरडे यांनी सहकार्य केले.

# आरक्षण उपवर्गीकरणाबाबत मुख्यमंत्र्यांनी संविधानिक भूमिका स्पष्ट करावी

## सामाजिक तेढ निर्माण होणार नाही, याची सरकारने खबरदारी घ्यावी; डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांची पत्रकार परिषदेत मागणी

बीड । प्रतिनिधी

अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा विषय अत्यंत संवेदनशील असून, याबाबत निर्णय घेताना संविधान, न्यायालयीन निर्णय आणि सामाजिक सलोखा यांचा विचार करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षण उपवर्गीकरणाबाबत सरकारची संविधानिक व अधिकृत भूमिका स्पष्ट करून समाजात तेढ निर्माण होणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंचचे अध्यक्ष डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी मंगळवारी बीड येथे पत्रकार परिषदेत केली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून समानता आणि बंधुतेचा संदेश दिला आहे. त्यामुळे कोणत्याही समाजघटकाला दुसऱ्या समाजघटकाविरुद्ध उभे करण्याचा प्रयत्न सरकारने करू नये. सर्व समाजघटकांना न्याय मिळाला पाहिजे; मात्र हा न्याय संविधान आणि कायद्याच्या चौकटीतच मिळाला पाहिजे, असे डॉ. ओव्हाळ यांनी सांगितले.

राज्यात आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ आणि विरोधात आंदोलने सुरू आहेत. या आंदोलनांमुळे अनुसूचित जातींतील विविध समाजघटकांमध्ये मतभेद वाढण्याची परिस्थिती निर्माण होत असून, सामाजिक सलोख्याला धक्का पोहोचण्याची शक्यता आहे. ही बाब सरकारने गांभीर्याने घेऊन समाजात तेढ निर्माण होणार नाही, याची जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, काही ठिकाणी आंदोलनांच्या वेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि इतर महापुरुषांविषयी आक्षेपार्ह भाषा वापरली जात असल्याच्या घटना समोर येत आहेत. अशी वक्तव्ये निषेधार्ह असून महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेला कलंकित करणारी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे संपूर्ण समाजाचे प्रेरणास्थान आहेत. मतभेद असू शकतात; मात्र महापुरुषांचा अपमान कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी राहुल कदम, विकास वाव्हळ, रमेश थोरात, रफिक पठाण, संजय वाव्हळ, अशोक सरवदे, बळीराम मस्के, अंबादास सोनवणे, राहुल गायकवाड, उमेश डोळस यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

### सरकारसमोर सहा प्रश्न


१ ऑगस्ट २०२४ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा निर्णय घेतला जाणार असेल, तर मातंग समाजाला किती टक्के आरक्षण देण्याचा सरकारचा प्रस्ताव आहे? ही टक्केवारी कोणत्या अधिकृत अभ्यास, आयोगाच्या अहवाल किंवा सांख्यिकीय निकषांच्या आधारे निश्चित केली जाणार आहे? आरक्षण उपवर्गीकरणाबाबत राज्य सरकारची अधिकृत भूमिका काय आहे? समाजातील वाढता तणाव रोखण्यासाठी सरकार कोणती ठोस पावले उचलणार आहे? अनुसूचित जाती समूहाचे वर्गीकरण करता येते का? तसेच सरसकट सर्व समूहांच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण केले जाणार आहे का?, असे सहा प्रश्न डॉ. ओव्हाळ यांनी उपस्थित केले. राज्य सरकारने याबाबत श्वेतपत्रिका प्रसिद्ध करून सर्व तथ्ये जनतेसमोर मांडावीत. महापुरुषांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून राज्यात शांतता निर्माण करावी. अनुसूचित जातींना जाणीवपूर्वक लक्ष्य करण्याचे प्रकार थांबवावेत; अन्यथा राज्यात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी दिला.

# आषाढी एकादशी निमित्त वडवणी ते श्री क्षेत्र थोरले पंढरी पोखरी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन

## काळा हनुमान गणेश मंडळाचा सलग २३ वर्षांचा अखंड भक्तिमय उपक्रम

वडवणी । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त काळा हनुमान गणेश मंडळ, वडवणी यांच्या वतीने गेल्या सलग २३ वर्षांपासून आयोजित करण्यात येणारा वडवणी ते श्री क्षेत्र थोरले पंढरी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, पोखरी पायी दिंडी सोहळा यंदाही मोठ्या भक्तिभावाने आयोजित करण्यात आला आहे.



हा पायी दिंडी सोहळा शनिवार, दि. २५ जुलै २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता वडवणी येथील काळा हनुमान मंदिरातून प्रारंभ होऊन श्री क्षेत्र थोरले पंढरी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, पोखरी येथे भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे.

वारकरी संप्रदायाची अनेक शतकांची अखंड परंपरा आजही भगव्या पताका, हरिनामाचा गजर, टाळ-मृदुंगाच्या निनादात जपली जात आहे. त्याच परंपरेचा वारसा जपत काळा हनुमान गणेश मंडळाने गेल्या २३ वर्षांपासून हा पायी दिंडी सोहळा अविरत सुरू ठेवला आहे. यंदाच्या दिंडीत आकर्षक सजावटीसह ट्रॅक्टरवर पालखी सोहळ्याचे विशेष आयोजन करण्यात आले असून, भक्तांसाठी हा सोहळा विशेष आकर्षण ठरणार आहे.

दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकरी व भाविकांसाठी विविध ठिकाणी फराळ, फळे, पिण्याचे पाणी, चहा व अन्य सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. हॉटेल प्रतीक्षा येथे युवा उद्योजक गणेश आबा कुरकूटे यांच्या वतीने फराळाचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच नगरसेवक नागेश डिंगे यांच्या वतीने फळवाटप, नगरसेवक सुधीर भाऊ ढोले व अरुण भागवत यांच्या वतीने फराळी चिप्सचे वितरण करण्यात येणार आहे. माजी नगरसेवक शिवाजी टकले फळ वाटप ,अनिल देवकते, गोरख बागडे व संजय पवार यांच्या वतीने चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून, ज्योतीराम कलेढोण व विठ्ठल कलेढोण यांच्या वतीने पिण्याच्या पाण्याचे वाटप होणार आहे. दिंडीतील पालखीची आकर्षक सजावट केतन रेडेकर यांच्या सौजन्याने करण्यात येणार आहे.

या दिंडी सोहळ्याचे आयोजन शंकर झाडे, जालिंदर चिनके, गणेश आबा कुरकूटे, बबन खटावकर, गणेश म्हेत्रे, गणेश टकले, वासुदेव लोकरे, नारायण जाधव, राहुल टकले, अमोल डिंगे व गौरव दिवटे, सुधाकर माळवदे यांच्या वतीने करण्यात आले आहे. या भक्तिमय पायी दिंडीत सहभागी होऊन विठ्ठलनामाचा गजर करत आध्यात्मिक आनंदाचा लाभ घ्यावा, असे आवाहन काळा हनुमान गणेश मंडळ, वडवणी यांच्या वतीने सर्व भाविक भक्तांना करण्यात आले आहे.

## पान ६ वरुन...

### वांगचुक यांच्यावरील कारवाईच्या

मुर्मूजी,सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश जस्टिस सुर्य कांतजी,पंतप्रधान नरेंद्र मोदी,गृहमंत्रीअमित शहा यांना जिल्हाधिकारी ,बीड यांचेमार्फत निवेदन सादर केले.

राज्य कार्यवाह प्राचार्य डॉ सविता शेटे, उपाध्यक्ष प्राचार्य कॉ डी जी तांदळे यांचेसह माजी आमदार उषाताई दराडे,भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ नामदेव चव्हाण,जिल्हा सेक्रेटरी कॉ भाऊराव प्रभाळे, राज्य कौन्सिल सदस्य व मराठवाडा शिक्षक संघाचे विभागिय सरचिटणीस कॉ राजकुमार कदम, मअंनिस बीड शाखेचे कार्याध्यक्ष प्रा.विजय घेवारे,प्रधान सचिव एड. करुणा टाकसाळ,उपाध्यक्ष एड. अंबादास आगे,महिला विभाग प्रमुख शुभांगी कुलकर्णी, प्रसिद्धी प्रमुख डॉ संजय तांदळे,किरण घाटगे, बाजीराव ढाकणे, एड. नितीन रांजवण, प्रज्ञा तुपारे, हिरामण तांदळे,विद्यार्थी संघटनेचे आकाश हजारे,दिशा प्रभाळे,अभिजित पवार यांच्या सह अनेकांनी या निदर्शने आंदोलनात उत्स्फूर्तपणे सहभाग घेवुन शासनाचा निषेध केला.

### लिंबागणेश येथील पाणंद

निवेदन सादर केले.

या रस्त्याचा उपयोग जाधव वस्ती, ढवळे वस्ती, घाडगे वस्ती, वाणी वस्ती, कानिटकर वस्ती, कुलकर्णी वस्ती, अंकुशे वस्ती आणि आगवान वस्ती येथील सुमारे ४०० ते ५०० नागरिक करतात. पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून शालेय विद्यार्थ्यांना, रुग्णांना, बाजारहाटासाठी जाणाऱ्या नागरिकांना तसेच शेतकऱ्यांना खत, बियाणे व शेतीसाठी आवश्यक साहित्य ने-आण करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. परिस्थितीची गंभीर दखल घेऊन प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्ता खुला करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याकडे केली आहे.

### मुख्य रस्त्यावरील डीपी

नगरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर अनेक वर्षांपासून अडथळा ठरत असलेली वीज वितरण कंपनीची डीपी (ट्रान्सफॉर्मर) अखेर हटविण्यात आली. तब्बल २५ वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न नगरसेविका सौ. समीक्षा मुन्ना गायकवाड यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मार्गी लागला. नगरसेविका सौ. समीक्षा मुन्ना गायकवाड यांनी संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करून हा प्रश्न निकाली काढला. डीपी हटविण्यात आल्याने तुळजाई चौक ते पंचशील नगर मार्गावरील वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत होणार असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.या कामाबद्दल परिसरातील नागरिकांनी नगरसेविका सौ. समीक्षा मुन्ना गायकवाड यांचे आभार व्यक्त केले.

### स्वातंत्र्यानंतर प्रथमच बेदरवाडीत

आनंद व्यक्त केला. यावेळी शाळेचे शिक्षक सुरवसे सर तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही बससेवा सुरू होण्यासाठी आमदार सुरेशअण्णा धस यांच्या विशेष सहकार्य व मार्गदर्शनाची महत्त्वाची भूमिका राहिली. तसेच पाटोदा आगाराचे आगारप्रमुख डोके साहेब आणि खेडकर साहेब यांनीही आवश्यक सहकार्य केले. हा ऐतिहासिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी हरीभैया काशीद, सरपंच राजेंद्र काकडे, दिनेश काटकर, परमेश्वर आमटे, बापू आमटे, जागधने माऊली यांच्यासह ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. पहिल्याच बसफेरीच्या निमित्ताने बेदरवाडीसाठी हा दिवस ऐतिहासिक ठरला असून, गावाच्या विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### तारकेश्वर गडावर मानवी

शेतकऱ्यांसाठी वीजबिल सवलत, कर्जमाफी, घरकुल योजना, सौरऊर्जा प्रकल्प तसेच रस्ते, पूल, सिंचन आणि इतर पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा उल्लेख करत आमदार धस यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना इन्फ्रा मॅन अशी गौरवपूर्ण उपाधी दिली.

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी दूरदृष्टीने कार्य करणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि यशस्वी सार्वजनिक जीवनासाठी शुभेच्छा देत आमदार सुरेश धस यांनी वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाला स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, गोभक्त आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटोदा तालुक्यातील सेतू केंद्र केवळ कागदावरच ? मूळ गावी केंद्र सुरू करण्याचे कडक आदेश द्यावेत

पाटोदा । प्रतिनिधी

गोरगरीब नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांना शासकीय दाखले व विविध योजनांचे अर्ज एकाच छताखाली सहज मिळावेत, यासाठी शासनाने सेतू सुविधा केंद्र (महा-ई-सेवा केंद्र) सुरू केले आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावात किंवा जवळच्या महसूल मंडळ स्तरावर ही सुविधा मिळणे अपेक्षित आहे. मात्र, पाटोदा तालुक्यातील बहुतांश सेतू सुविधा केंद्रे केवळ पाटोदा शहरातच एकवटली असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीबांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून, जिल्हाधिकारी बीड यांनी या प्रकरणात तात्काळ लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

पाटोदा तालुक्यातील ग्रामीण भाग मोठा असून, दुर्गम गावांतील नागरिकांना तहसील कार्यालय किंवा उपविभागीय कार्यालयाशी संबंधित कामांसाठी थेट पाटोदा शहर गाठावे लागते. शासनाच्या नियमानुसार प्रत्येक महसूल मंडळात आणि मोठ्या गावांमध्ये सेतू केंद्रे कार्यरत असणे बंधनकारक आहे. परंतु, अनेक केंद्रचालकांनी ग्रामीण भागात मंजुरी घेऊनही आपली दुकाने पाटोदा शहरात थाटली आहेत.

आर्थिक भुर्दंड आणि वेळेचा अपव्यय

सध्या शैक्षणिक वर्ष सुरू असल्याने विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला अशा विविध कागदपत्रांची प्रचंड आवश्यकता आहे. ग्रामीण भागातून पाटोदा शहरात ये-जा करण्यासाठी नागरिकांना १०० ते २०० रुपये केवळ प्रवासावर खर्च करावे लागतात. एका दाखल्यासाठी दोन ते तीन वेळा फेऱ्या माराव्या लागत असल्याने मजुरी करणाऱ्या पालकांचा संपूर्ण दिवसाचा रोजगार बुडतो. प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे आणि तपासणीअभावी या केंद्रचालकांचे फावले आहे. यामुळे शासनाचा मूळ उद्देशच पायदळी तुडवला जात असल्याचे चित्र पाटोदा तालुक्यात पाहायला मिळत आहे.

शासन आपल्या दारी अशा घोषणा दिल्या जात असताना, प्रत्यक्षात मात्र ग्रामीण जनतेला एका दाखल्यासाठी शहराचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. या गंभीर समस्येकडे बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष द्यावे. पाटोदा तालुक्यातील ज्या सेतू केंद्रांना ग्रामीण भागाची मंजुरी आहे, त्यांना त्यांच्या मूळ गावी केंद्र सुरू करण्याचे कडक आदेश द्यावेत. आदेश न पाळणाऱ्या केंद्रचालकांचे परवाने रद्द करून ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना नवीन संधी द्यावी, जेणेकरून गोरगरीब नागरिक आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळेल, अशी आग्रही मागणी पाटोदा तालुक्यातील जनतेमधून होत आहे.

# 'वारकऱ्यांची सेवा हाच विठ्ठलाचा खरा प्रसाद' ; युसूफवडगांव येथील अन्नदात्यांकडून भोजनदानाची सेवाभावी परंपरा

युसूफवडगांव । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी विदर्भासह राज्याच्या विविध भागांतून पायी पंढरपूरकडे निघालेल्या वारकऱ्यांच्या दिंड्यांना केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे प्रेमाने भोजन दिले जात आहे. गावातील काही अन्नदाते कोणत्याही संस्थेच्या किंवा संयुक्त समितीच्या माध्यमातून नव्हे, तर स्वतःच्या श्रद्धेतून आणि स्वखर्चाने दरवर्षी ही सेवा बजावत असून,अन्नदानाची परंपरा आजही अखंडपणे जपली जात आहे.




टाळ-मृदंगाच्या गजरात, ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात आणि विठ्ठल नामाच्या अखंड स्मरणात चालणाऱ्या वारकऱ्यांचा प्रवास अत्यंत कष्टाचा असतो. अशा वेळी युसूफवडगावांतील अन्नदाते त्यांचे आत्मीयतेने स्वागत करून भोजनाची व्यवस्था करतात. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांसाठी ही सेवा मोठा दिलासा ठरत असून, भोजनानंतर वारकरी अन्नदात्यांना मनःपूर्वक आशीर्वाद देत पुढील प्रवासाला मार्गस्थ होतात. विशेष म्हणजे,या सेवेमागे कोणताही गाजावाजा, प्रसिद्धीचा हव्यास किंवा सामूहिक आयोजन नसते. गावातील काही ठराविक कुटुंबे अनेक वर्षांपासून ही परंपरा निस्वार्थ भावनेने जपत आहेत.अन्नदान हेच श्रेष्ठ दान मानून विठ्ठलभक्तांची सेवा करण्याचे भाग्य लाभावे,हीच त्यांची भावना असते.त्यामुळे युसूफवडगांवची ही सेवाभावी परंपरा परिसरात कौतुकाचा विषय ठरली आहे. आषाढी वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून,भक्ती, समता, सेवा आणि माणुसकीचा महान उत्सव आहे. या उत्सवात युसूफवडगांवातील अन्नदात्यांनी जपलेली भोजनदानाची परंपरा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, वारकऱ्यांची सेवा म्हणजे साक्षात विठ्ठलाची सेवा हा संदेश त्यांच्या कार्यातून प्रत्येक वर्षी अधिक दृढ होत आहे.

# शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणासाठी समाजाने पुढे यावे - बाजीराव ढाकणे

## आपल्या गावात एकही बालक शिक्षणापासून वंचित राहू देणार नाही अशी शपथ बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी घ्यावी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात दिनांक १५ जुलै ते ३० जुलै २०२६ या कालावधीत समग्र शिक्षण अभियानांतर्गत शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित बालकांचे विशेष सर्वेक्षण राबविण्यात येत असून या मोहिमेस नागरिकांनी उत्स्फूर्त सहकार्य करावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा लेक लाडकी अभियानाचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी केले आहे.

ढाकणे यांनी नागरिकांना आवाहन केले की, आपल्या गावात, वाड्या-वस्त्यांवर किंवा परिसरात शाळेत न जाणारे, सतत अनुपस्थित राहणारे किंवा स्थलांतरित कुटुंबातील बालक आढळल्यास त्याची माहिती तात्काळ संबंधित शाळा, ग्रामपंचायत, शिक्षक किंवा शिक्षण विभागाला द्यावी.

या मोहिमेत शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती, युवक मंडळे, महिला बचत गट आणि स्वयंसेवी संस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले. विशेषतः ऊसतोड कामगार व इतर स्थलांतरित मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्याची गरज ढाकणे यांनी व्यक्त केली. एकही बालक शिक्षणापासून वंचित राहणार नाही, हा संकल्प प्रत्येक गावाने करावा. शिक्षणाची गंगा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली तरच खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडेल, असे भावनिक आवाहन लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांनी केले.जिल्हा प्रशासनाच्या या उपक्रमामुळे शाळाबाह्य मुलांची अचूक नोंद होऊन त्यांना पुन्हा शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी ब्रिज कोर्स, विशेष प्रवेश मोहीम, शालेय साहित्य व शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहितीही ढाकणे यांनी दिली.



समग्र शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने आयोजित नियोजन बैठकीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत असून प्रत्येक बालकाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. ढाकणे म्हणाले, शिक्षण हा प्रत्येक बालकाचा घटनात्मक आणि मूलभूत हक्क आहे. आर्थिक अडचणी, स्थलांतर, ऊसतोड मजुरी, सामाजिक परिस्थिती किंवा इतर कारणांमुळे अनेक मुले शाळेपासून दूर जातात. अशा प्रत्येक बालकांचा शोध घेऊन त्याला पुन्हा शाळेत दाखल करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजाचेही सामूहिक कर्तव्य आहे.

ठळक मुद्दे : १५ ते ३० जुलैदरम्यान विशेष सर्वेक्षण, शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित बालकांवर लक्ष, नागरिकांनी माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, ऊसतोड व स्थलांतरित कामगारांच्या मुलांच्या शिक्षणावर विशेष भर, एकही बालक शिक्षणापासून वंचित राहणार नाही असे नियोजन शिक्षण विभागाने केले पाहिजे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.

cmyk

# भारत-अमेरिका मुक्त व्यापार कराराविरोधात शेतकऱ्यांचा दिल्लीकडे मोर्चा

## हरियाणा सीमेवर पोलिसांनी रोखले

दिल्ली / वृत्तसंस्था

भारत आणि अमेरिका यांच्यात प्रस्तावित मुक्त व्यापार करार रद्द करण्याच्या मागणीसाठी मंगळवारी दिल्लीकडे कूच केलेल्या शेतकऱ्यांना हरियाणा पोलिसांनी सीमेवरच अडवले आहे. त्यामुळे हरियाणाच्या सीमेवर तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. दिल्लीकडे निघालेल्या शेतकऱ्यांना खनौरी आणि शंभू सीमेवर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. तसेच परिस्थिती लक्षात घेऊन भारतमाला-जम्मू-कटरा एक्स्प्रेसवेसह अनेक प्रमुख मार्गांवर सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

देश बचाओ मोर्चाच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी दिल्लीत आंदोलनासाठी निघाले आहेत. प्रस्तावित भारत-अमेरिका मुक्त व्यापार करारामुळे भारतीय शेती, दुग्ध व्यवसाय आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला फटका बसेल, असा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे. दिल्लीकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांना हरियाणा पोलिसांनी खनौरीजवळ अडवले आहे. भारतमाला-जम्मू-कटरा एक्स्प्रेसवेवर मोठमोठे बॅरिकेड उभारून मार्ग बंद करण्यात आला. काही ठिकाणी पोलिस आणि शेतकरी समोरासमोर आले. तर शंभू सीमेवरही



पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या परिसरात भारतीय न्याय संहिता कलम १६३ लागू करण्यात आले असून, दंगल नियंत्रण पथकासह मोठ्या संख्येने पोलिस तैनात आहेत. दोन्ही बाजूंचे रस्ते बॅरिकेड करून वाहतुकीवरही निर्बंध घालण्यात आले आहेत. शेतकरी मजूर मोर्चाचे नेते सरवन सिंह पंधेर यांनी सांगितले की, शेतकरी दिल्लीला जाण्यास तयार आहेत. मात्र त्यांना पुढे जाऊ द्यायचे की रोखायचे, हा निर्णय हरियाणा आणि केंद्र सरकारच्या हातात आहे. ते म्हणाले, ''आम्ही प्रस्तावित भारत-अमेरिका मुक्त व्यापार कराराला विरोध करत आहोत. या कराराचा फायदा अमेरिकेतील शेतकऱ्यांना होईल, पण भारतीय शेतकऱ्यांचे नुकसान होईल. या कराराची माहिती आम्हाला भारत सरकारकडून नव्हे, तर व्हाईट हाऊसने प्रसिद्ध केलेल्या माहितीतून मिळाली.'' पंधेर यांनी स्पष्ट केले की, शेतकरी कोणतेही बॅरिकेड जबरदस्तीने तोडणार नाहीत. प्रथम सरकारशी चर्चा करून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नुकत्याच झालेल्या जालंधर दौऱ्याचाही त्यांनी उल्लेख केला. हरियाणातील शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत हमीभाव योजनेचा पूर्ण लाभ मिळत असल्याच्या दाव्यांवर शेतकऱ्यांमध्ये प्रश्न उपस्थित होत असल्याचे त्यांनी म्हटले.

शेतकऱ्यांच्या मागण्या : प्रस्तावित भारत-अमेरिका मुक्त व्यापार करार रद्द करावा. भारतीय शेती आणि दुग्ध व्यवसायाला परदेशी स्पर्धेपासून संरक्षण द्यावे. किमान आधारभूत किंमत अर्थात हमीभाव व्यवस्थेला कायदेशीर हमी द्यावी. कृषी धोरणांशी संबंधित निर्णय घेताना शेतकरी संघटनांशी व्यापक सल्लामसलत करावी.

# सिमला मिरचीवर पडणारे रोग आणि प्रतिबंधात्मक उपाय



सिमला मिरची ही भारतातील खास भाज्यांपैकी एक आहे. त्याची लागवड शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या दृष्टीने खूप फायदेशीर ठरू शकते. सिमला मिरची ही बहुमुखी आणि उच्च मूल्याची भाजी आहे. ज्याला स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारात चांगली मागणी आहे. सिमला मिरची लागवडीसाठी ऑगस्ट महिना सर्वात खास मानला जातो. कारण या महिन्यात पावसामुळे पाण्याची समस्या नाही. या महिन्यात कोणत्याही पिकाच्या झपाट्याने वाढीबरोबरच उत्पादनही चांगले होते.

सिमला मिरचीवरील रोग : जिवाणूजन्य पानांचे ठिपके - या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर सिमला मिरचीच्या पानांवर पिवळे प्रभामंडल असलेले लहान, पाण्यात भिजलेले ठिपके दिसतात, जे नंतर तपकिरी किंवा काळे होतात. हे टाळण्यासाठी रोग प्रतिकारक वाणांचा वापर करावा. वरून झाडांना पाणी द्या जेणेकरून पाणी पानांवर पडणार नाही. जमिनीत रोगजनकांना प्रतिबंध करण्यासाठी पीक लागवडीची जागा बदलत रहा.

फायटोफथोरा ब्लाइट - हे देठ आणि फळांवर खोल पाण्यात भिजलेले जखम दाखवते. याच्या प्रभावामुळे पाने कोमेजून कुजण्याची लक्षणे दिसू शकतात. हे टाळण्यासाठी पिकाच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नका. पानांवर जास्त पाणी देणे आणि सिंचन टाळा. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी संक्रमित झाडे काढून टाका. ज्यामध्ये, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मेटालॅक्सिल किंवा फोसेटाइल-ॲल्युमिनियम बुरशीनाशक वापरा.

व्हर्टिसिलियम विल्ट - पाने पिवळी आणि कोमेजतात. काही प्रकरणांमध्ये पाने पूर्णपणे मरतात. हे टाळण्यासाठी प्रमाणित रोगमुक्त बियाणे व रोपे वापरावीत. चांगल्या निचरा होणाऱ्या जमिनीत लागवड करा आणि जास्त सिंचन टाळा. जमिनीत रोगजनकांचा जमाव कमी करण्यासाठी पिके फिरवा. या रोगासाठी कोणतेही प्रभावी रासायनिक उपचार नाहीत, त्यामुळे प्रतिबंध आणि व्यवस्थापन धोरणांवर लक्ष केंद्रित केले जाते.

पावडर बुरशी - यामध्ये पाने, देठ आणि फळांवर पांढरे पावडर ठिपके दिसतात. हे टाळण्यासाठी, हवेच्या चांगल्या अभिसरणासाठी झाडांमध्ये पुरेसे अंतर ठेवा. झाडांभोवती ओलावा कमी करण्यासाठी ओव्हरहेड पाणी देणे टाळा. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सल्फर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट-आधारित बुरशीनाशक वापरा. ॲफिडचा प्रादुर्भाव - ॲफिड हे लहान आणि मऊ शरीराचे कीटक आहेत जे वनस्पतींमधून रस शोषतात. यामुळे वाढ खुंटते आणि पाने विकृत होतात. हे टाळण्यासाठी, लेडीबग्स आणि लेसविंग्स सारख्या नैसर्गिक भक्षकांना प्रोत्साहन द्या. ॲफिड लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कीटकनाशक किंवा कडुलिंबाच्या तेलाचा वापर करा. वनस्पतींभोवती ॲल्युमिनियम फॉइल ॲफिड्सला प्रतिबंध करू शकते.

# मुरघास निर्मिती देते जनावरांसाठी वर्षभर चाऱ्याची हमी!

पशुपालन व्यवसाय यशस्वी करायचा असल्यास सर्वात महत्त्वाचे आहे ते म्हणजे पशुखाद्य. कारण जनावरांना योग्य प्रमाणात आणि चांगल्या प्रतिचे पशुखाद्य पुरविले तर दुधाचे चांगले आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळते. जनावरांना देण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या पशुखाद्यांपैकी हिरवा चारा यात सर्वात अधिक पौष्टिक घटक असतात. परंतु हा हिरवा चारा जनावरांना वर्षभर उपलब्ध होईलच असे नाही. यावर उपाय म्हणजे मुरघास निर्मिती. 'मुरघास म्हणजे हवा विरहित जागेत किण्वनीकरण (आंबवून) तयार करून साठवलेला चारा होय.' या पद्धतीमुळे हिरवा चारा त्यातील पौष्टिक घटकांसोबत जास्त काळपर्यंत टिकवून ठेवता येतो.



मुरघासचे फायदे : हिरवा चारा त्याच्या गुणधर्मासह टिकविला जातो. वाळलेल्या चाऱ्यापेक्षा साठवणुकीस जागा सुद्धा कमी लागते. मुरघासला वाळवण्याची गरज नसल्यामुळे पावसाळ्यात सुद्धा तयार करता येतो. मुरघास रुचकर, कसदार, चवदार असल्यामुळे जनावरे आवडीने खातात तसेच पचायला हलका असतो. एकाच हंगामात जास्तीत जास्त मुरघास तयार करून दुसऱ्या हंगामात जमीन इतर पिकांसाठी वापरता येते. खरीप आणि रब्बी हंगामातील जास्तीचा हिरवा चारा साठवून चारा टंचाईच्या काळात वापरता येतो. पशुखाद्यावरील खर्च कमी होऊन दूध उत्पादनात सातत्य राहते.वापरण्यात येणारी पिके : एकदल पिके - मका, ज्वारी, बाजरी, ओट आणि गवत पिके. द्विदल पिके - लुर्सन, चवळी, बरसीम, गवार, वाल आणि पावटा.

मुरघास तयार करण्यासाठी : प्लॅस्टिक बॅग - ५ किलो, १० किलो, ५० किलो, १०० किलो, ५०० किलो, १००० किलो अशा प्रमाणात मुरघास बॅग उपलब्ध आहेत. या बॅग्स वारंवार वापरात येऊ शकतात. हाताळायलाही सोप्या असतात. ड्रम सायलेज - प्लॅस्टिक ड्रमची क्षमता १००ते ३०० लिटरपर्यंत असते. ज्या ठिकाणी छोट्या प्रमाणात मुरघास तयार करावयाचा आहे आणि साखळी पद्धतीने वापरायचा आहे, त्या ठिकाणी ही पद्धत उपयुक्त आहे.

मुरघास तयार करण्याची प्रक्रिया : चारापिके ५० टक्के फुलोऱ्यात असताना कडबाकुट्टी यंत्राने लहान तुकडे करतात. एकदलवर्गीय पिकापासून आणि द्विदल वर्गीय पिकापासून मुरघास बनविताना ४:१ प्रमाण घ्यावे यामुळे रुचकर मुरघास बनतो. एकदलवर्गीय पिकापासून मुरघास बनवितेवेळी एक किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून हे मिश्रण चारा कुट्टीवर शिंपडतात. द्विदलवर्गीय पिकापासून मुरघास बनविताना त्यावर गूळ द्रावणाचे मिश्रण शिंपडतात. त्यासाठी एक किलो गूळ १०० लिटर पाण्यात विरघळवून द्रावण तयार केले जाते. कुट्टी तयार करून खड्ड्यात एक फुटापर्यंत थर येईल अशा पद्धतीने भरावे. प्रत्येक थरानंतर वर सांगितलेले द्रावण शिंपडावे. चाराकुट्टीचा थर खड्ड्यात भरताना दाब द्यावा, त्यामुळे चाऱ्यामध्ये हवा राहत नाही. अशा पद्धतीने थरावर थर देत जाऊन खड्डा भरावा. त्यावर वाळलेले गवत किंवा कडबा यांच्या मदतीने आच्छादन करतात. शेण व मातीच्या मिश्रणाने नंतर लिंपून गोलघुमटासारखा आकार द्यावा. साधारण दोन महिन्यांनी चांगला, स्वादिस्ट, रुचकर असा पौष्टिक मुरघास तयार होतो .

जनावरांना किती मुरघास द्यावा? गाई व म्हशीला २० ते २५ किलो मुरघास द्यावा. हा चारा दिवसातून २ ते ३ वेळा द्यावा. शेळी आणि मेंढीला ५०० ते ७०० ग्राम चारा द्यावा. दुधाळ जनावरांना मुरघास चारा धारा काढल्यानंतर द्यावा. चारा जर जास्तच आंबट किंवा आम्लयुक्त असेल तर तो थोडा वेळ सुकून द्यावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

३५६ : ३५६ इ.स. पूर्व : जगातील सात आश्चर्यांपैकी एक एफिसस आर्टेमिसचे मंदिर नष्ट झाले.
१८३१ : बेल्जिअमचा पहिला राजा लिओपॉल्ड याचा शपथविधी झाला.
१८७९ : क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांना इंग्रजांनी अटक केली
१८८३ : कोलकाता येथे पहिल्या नाट्यगृहाची स्थापना
१८८४ : लॉर्डस मैदानात पहिले क्रिकेट टेस्ट मॅचः सेंट जॉन्सवूड यांनी लंडनमध्ये लॉर्डस मैदानाचा शोध लावला. त्यामुळेच या मैदानाचे नाव लॉर्डस ठेवण्यात आले. या लॉर्डस मैदानावर पहिला कसोटी सामना खेळवण्यात आला.
१८८८ : स्कॉटिश शोधकर्ता आणि पशुवैद्यकीय सर्जन जॉन बॉयड डनलॉप यांनी रबराचे टायर आणि ट्यूब तयार करून परिवहन करण्यास गती निर्माण करून दिली.
१९४४ : २० जुलै १९४४ रोजी ॲडॉल्फ हिटलरची हत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या क्लाऊस व्हॉन स्टाऊफेनबर्गला फाशी देण्यात आले.
१९५४ : पहिले इंडोचिनी युद्ध जिनिव्हा परिषदेने व्हिओतनाम देशाचे उत्तर व्हिएतनाम आणि दक्षिण व्हिएतनाममध्ये विभाजन केले. २१ जुलै १९५४ रोजी जिनिव्हा येथे झालेल्या एका परिषदेत इंडोचीनची फाळणी करण्याचे ठरले.
१९६० : सिरीमाओ बंदरनायके या श्रीलंकेच्या ६ व्या पंतप्रधान बनल्या. त्या जगातील पहिल्या महिला पंतप्रधान होत.
१९६२ : भारत चीन सीमावाद भारत-चीन युद्ध
१९६३ : कशी विद्यापीठाला विश्वविद्यालयाचा दर्जा मिळाला.
१९७६ : आयर्लंडमधील ब्रिटिश राजदूताची हत्या
१९८३ : अंटार्क्टिकावरील व्होस्टॉक येथे उणे ८९.२ सेल्सिअस या पृथ्वीवरील आत्तापर्यंतच्या सर्वात नीचांकी तापमानाची नोंद केली गेली.
२००२ : जगभर दूरसंचार सेवा पुरवणार्या 'वर्ल्ड कॉम' या अमेरिकन कंपनीने दिवाळखोरी घोषित केली.
२००७ : प्रतिभा पाटील भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती बनल्याः २१ जुलै २००७ रोजी प्रतिभा पाटील यांनी राष्ट्रपतीपदाची जबाबदारी स्वीकारली. भारताच्या राष्ट्रपतीपदावर नेमल्या गेलेल्या त्या पहिल्या महिला होत्या.
२०१८ : भारतामधील सॅनिटरी उत्पादनावरील टॅक्स सरकारने होत असलेल्या विरोधानंतर मागे घेतला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१६ : ब्रिटीश वर्तमानपत्र समूह राईटर चे संस्थापक ज्युलियस राईटर यांचा जन्मदिन.
१८५३ : शंकर बाळकृष्ण दीक्षित ज्योतिर्विद, पाश्चिमात्य व पौर्वात्य जोतिषगणिताचे अभ्यासक, ग्रंथलेखक (मृत्यूः २७ एप्रिल १८९८)
१८९९ : अर्नेस्ट हेमिंग्वे नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन लेखक (मृत्यूः २ जुलै १९६१)
१९१० : वि. स. पागे स्वातंत्र्यसैनिक, गांधीवादी कार्यकर्ते, संत वाङ्मयाचे अभ्यासक, महाराष्ट्र विधानसभेचे सभापती, रोजगार हमी योजनेचे जनक (मृत्यूः १६ मार्च १९९०)
१९११ : भारतीय लेखक, कवी आणि विद्वान उमाशंकर जोशी यांचा जन्म. (मृत्यूः १९ डिसेंबर १९८८)
१९२० : आनंद बक्षी गीतकार (मृत्यूः ३० मार्च २००२)
१९३० : डॉ. रा. चिं. ढेरे भारतीय संस्कृतीचे अभ्यासक संशोधक
१९३४ : चंदू बोर्डे भारतीय क्रिकेटपटू आणि निवड समितीचे अध्यक्ष पद्म भूषण, पद्मश्री, अर्जुना पुरस्कार
१९४५ : दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू बॅरी रिचर्ड्स यांचा जन्म.
१९४७ : चेतन चौहान सलामीचे फलंदाज आणि राज्यसभा सदस्य
१९५१ : अमेरिकन हास्य अभिनेते रॉबिन विलियम्स यांचा जन्मदिन.
१९६० : पंजाबी गायक अमरसिंग चमकीला यांचा जन्म. (मृत्यूः ८ मार्च १९८८)
१९६८ : आदित्य श्रीवास्तव भारतीय अभिनेते

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०६ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रथम अध्यक्ष व राजकारणी उमेशचंद्र बनर्जी यांचे निधन.
१९७२ : जिग्मे दोरजी वांगचुक भूतानचे राजे (जन्मः २ मे १९२९)
१९९४ : डॉ. र. वि. हेरवाडकर इतिहास संशोधक, वाङ्मय समीक्षक, मराठी बखर वाङ्मयाचे व्यासंगी अभ्यासक (जन्मः)
१९९५ : सज्जाद हुसेन संगीतकार व मेंडोलीनवादक (जन्मः १५ जून १९१७ सीतामहू, मंदसौर, मध्य प्रदेश)
१९९७ : राजा राजवाडे साहित्यिक (जन्मः १ जानेवारी १९३६). राजा राजवाडे यांनी अनेक कादंबऱ्या, कथासंग्रह, कविता संग्रह, ललित गद्य लिहिले आहेत. तसेच त्यांनी सलग ३५ वर्षे १८ नियतकालिकांतून स्तंभलेखन केलं आहे.
१९९८ : अमेरिकन अंतराळवीर ऍलन शेपर्ड यांचे निधन.
२००१ : विझुपुरम चिन्नया तथा शिवाजी गणेशन दाक्षिणात्य अभिनेते (जन्मः १ आक्टोबर १९२८)
२००२ : मराठी चित्रकार गोपाळराव बळवंतराव कांबळे यांचे निधन.
२००९ : गंगूबाई हनगळ किराणा घराण्याच्या शास्त्रीय गायिका (जन्मः ५ मार्च १९१३)
२०१३ : भारतीय मार्शल आर्टिस्ट लूरेम्बॅम ब्रजेशोतोरी देवी यांचे निधन. (जन्मः १ जानेवारी १९८१)

# झेंडूची लागवड करा आणि झटपट मिळवा लाखोंचे उत्पन्न

झेंडूच्या फुलाची लागवड हंगामानुसार केली जाते. उन्हाळ्यात जानेवारी महिन्यात फुलांची लागवड केली जाते. ज्यांचा नवरात्रीच्या दिवसांत पूजेत मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो आणि बाजारात त्यांना चांगला भावही मिळतो. यानंतर हिवाळा सुरू होण्यापूर्वी एप्रिल-मेमध्ये आणि पुन्हा ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये फुलांची पेरणी केली जाते. झेंडूचे फूल हे देशभरातील महत्त्वाचे फूल आहे. या फुलांचा मोठ्या प्रमाणावर हार आणि सजावटीसाठी वापर केला जातो. याव्यतिरिक्त, ते विविध फुलांच्या व्यवस्थेमध्ये, रस्त्याच्या कडेला असलेल्या बागांमध्ये तसेच भांडीमध्ये लावले जाते. राज्यात झेंडूचे उत्पादन तिन्ही हंगामात घेतले जाते आणि त्याला जास्त मागणी असते. झेंडूचा वापर प्रामुख्याने सुट्टीच्या फुलांसाठी केला जातो. झेंडू हे प्रामुख्याने थंड हवामानातील पीक आहे, झेंडूची वाढ आणि फुलांचा दर्जा थंड हवामानात चांगला असतो. झेंडूची लागवड पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा या तिन्ही ऋतूंमध्ये हवामानाच्या परिस्थितीनुसार केली जाते.

आफ्रिकन झेंडूची लागवड फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यानंतर आणि जुलैच्या पहिल्या आठवड्यापूर्वी केल्यास उत्पादनावर आणि फुलांच्या गुणवत्तेवर चांगला परिणाम होतो. त्यामुळे जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून १५ दिवसांच्या अंतराने पेरणी केल्यास ऑक्टोबर ते एप्रिलपर्यंत चांगले उत्पादन मिळते. परंतु सप्टेंबरमध्ये लागवड केलेल्या झेंडूपासून सर्वाधिक उत्पादन मिळते.

लागवडीसाठी जमीन :झेंडूची लागवड विविध प्रकारच्या जमिनीत करता येते. सुपीक, पाणी टिकवून ठेवणारी परंतु पाण्याचा चांगला निचरा होणारी माती झेंडूसाठी चांगली असते. झेंडूचे क्षेत्रफळ ७.० ते ७.६ असलेल्या जमिनीत चांगले वाढते. झेंडू पिकाला भरपूर सूर्यप्रकाश लागतो. झाडे सावलीत चांगली वाढतात पण फुले येत नाहीत.

महत्वाच्या जाती : पुसा ऑरेंज, (क्रॅकर जॅक आगर सुवर्ण महोत्सवी) - या जातीला लागवडीनंतर १२३-१३६ दिवसांत फुले येतात. बुश ७३ से. मी उंच आहे आणि वाढ देखील जोमदार आहे. फुले नारिंगी रंगाची आणि ७ ते ८ सें.मी. मी व्यासांचा आहे. प्रति हेक्टर उत्पादन ३५ मी. टन/हेक्टर. पुसा बसंती (गोल्डन यलो जर्सन जायंट) - या जातीला १३५ ते १४५ दिवसांत फुले येतात. झुडूप ५९ से. मी उंच आणि मजबूत वाढतो. फुले पिवळी आणि ६ ते ९ सें.मी. मी व्यासांचा आहे. लागवडीपूर्वीची तयारी : लागवडीपूर्वी जमीन २ ते ३ वेळा खोल नांगरून, २ ते ३ वेळा खोडवा आणि भुस व हरळीची मुळे काढून टाका. नंतर हेक्टरी २५ ते ३० टन चांगले कुजलेले शेण मिसळून त्यात ५० किलो नत्र, २०० किलो मिसळावे. स्फुरद आणि २०० किलो पालाश पेरणीपूर्वी जमिनीत चांगले मिसळावे. आणि नंतर ६० से. थोड्या अंतरावर साडीचा वरंबा तयार करा आणि नंतर साडीच्या नाकपुड्या फोडून पुराव्याच्या सोयीनुसार पाण्याचे बाष्पीभवन करा.

खताचा वापर : खत २५ ते ३० मे. १०० किलो नत्र, २०० किलो स्फुरद आणि २०० किलो ही खते प्रति हेक्टरी द्यावीत, संकरित वाणांची लागवड करावयाची असल्यास लागवडीपूर्वी २५० किलो नत्र/हेक्टरी आणि ४०० किलो पालाश जमिनीत मिसळावे.





राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
बुधवार दि.२२ जुलै २०२६ ५



# विधवा - विधुर, दिव्यांग घटस्फोटितांचा राजस्तरीय मेळावा

## पुन:र्विवाह इच्छुकांनी ३१ जुलै पर्यंत नोंदणी करावी-हस्तीमल बंब

जालना। प्रतिनिधी

राजस्थानी समाजाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठकीत प्रास्ताविक करतांना श्री हस्तीमलजी बंब म्हणाले जैन, अग्रवाल, माहेश्वरी, ब्राम्हण, खंडेलवाल इ. राजस्थानी समाजातील पुनःर्विवाह इच्छुक विधवा-विधुर, अपंग व घटस्फोटीतांच्या एक दिवसीय राज्यस्तरीय परिचय सम्मेलन येत्या १६ अगस्त २०२६ रविवार रोजी सकाळी ९:०० ते संध्याकाळी ५:०० वाजे पर्यंत जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे आयोजित करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातुन अन्य राज्यातून येणाऱ्या उमेदवारांची त्यांच्या माहितीची पुस्तक प्रकाशित करण्यात येत आहे. त्यामुळे उत्सुक उमेदवारांनी, पालकांनी ३१ जुलै पर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. धावपळीच्या, स्पर्धेच्या युगात, तणावपूर्ण जीवन, पाश्चात्य शैली, हायब्रीड खान-पान, व्यस्नाधीनता मुळे तरुण सुध्दा आजारी पडत आहे. दोनचाकी, चार चाकी वाहन प्रत्येका कडे आहे प्रवास करणे, फिरणे, वाहतुक कोंडी मुळे अपघात सुध्दा वाढलेले आहे.



त्यामुळे कमी वयात विधवा-विदुरची संख्या फार प्रमाणात दिसुन येते. एकीकडे शिक्षणात प्रगती दिसून येते तर दुसरी कडे तरुण-तरुणी मध्ये मतभेद मुळे घटस्फोटीतांची समाजा मध्ये भयंकर समस्या आहे. तसेच अंपग, विकलांग, दिन-दुःखी उमेदवारांचे नाते जुळणे, टिकणे, निभणे अवघड प्रश्न आहे, असे पुनःर्विवाह इच्छुकांचा परिचय सम्मेलन काळाची गरज आहे. या मेळाव्यात शेकडो उमेदवारांना एकाच मंचावर नाते जुळविण्याची संधी मिळते, त्यामुळे वेळ व अनावश्यक खर्च टाळण्यास मदत होईल. उमेदवार सोबत १ पालक यांना प्रवेश देण्यात येईल. विखुरलेल्या कुटुंबाना परत जोडून त्यांचे संसार उजळणार. मानव सेवा हिच ईश्वर सेवा आहे, असे बंब म्हणाले. नरेन्द्र मोदी, सुदेश सकलेचा, कचरुलाल नवलखा, सतिष पंच, विजय राठी, अशोक मिश्रा, अर्जुन खंडेलवाल यांनी आपले विचार मांडुन चर्चात भाग घेतला. अधिक माहितीसाठी हस्तीमलजी बंब व नोंदणी साठी दीपक मोदी यांच्याशी संपर्क साधावा. या भव्य मेळाव्यासाठी आवास-निवास, भोजन व्यवस्था, नोंदणी ई. कमिटी नेमण्यात आली. मराठवाडा व राज्य स्तरीय दौरे करण्यासाठी नोंदणी फॉर्म, प्रचार सामुग्री वितरण करण्यात आली. या साठी विनोद बंब, सतिष बोथरा, राजेन्द्र सावजी, ताराचंद कुचेरिया, बसंतीलाल गोलेच्छा, कचरुलाल पाटणी, धनराज जैन, अशोक दहातोंडे, सुभाष सोनुने इ. परिश्रम घेत आहे. तरी पुनःर्विवाह इच्छुकांनी मोठ्या संख्येने नोंदणी करून व उपस्थित राहुन आपल्या उज्जवल भविष्यासाठी जीवनसाथी निवडण्याची सुर्वण संधीचा लाभ घ्यावा, असे आव्हान मुख्य संयोजक हस्तीमल बंब यांनी केले आहे.

# शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे आंदोलन

## नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घोषणाबाजी



धाराशिव। प्रतिनिधी

नीट परीक्षा पेपर फुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारुन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देण्यात यावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या युवक काँग्रेसने सोमवारी जिल्हा कचेरीसमोर जोरदार आंदोलन केले. यावेळी केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

वारंवार होणारे पेपरफुटीचे प्रकार, भरती प्रक्रियेतील गैरव्यवहार, ऑनलाइन परीक्षा व्यवस्थेतील त्रुटीमुळे तरुण, विद्यार्थ्यांचे भवितव्य संकटात सापडत असल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद पवार पक्षाच्या वतीने सोमवारी जिल्हा कचेरीसमोर दुपारी १२. ३० वाजण्याच्या सुमारास आंदोलन करण्यात आले.

या सरकारचं करायचं काय, खाली मुंडक वर पाय, राजीनामा दो राजीनामा दो, धर्मेंद्र प्रधान राजीनामा दो, अशा घोषणांनी जिल्हाकचेरी परिसर दणाणून सोडला. विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. निवेदनावर युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, युवक शहराध्यक्ष रणवीर इंगळे, अमर गुंड, आदी पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# अवैध वाळू उत्खनन व वाहतुकी विरुद्ध कारवाई :४८ लाखांचा मुद्देमाल जप्त

## अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या पथकाची कारवाई



जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाची वाळू चोरून नेणारे यकीन जमील शेख रा भोकरदन संदीप काळे रा . पिंपळगाव या दोघाविरुद्ध कारवाई करण्यात आली. श्री. तेगबीर सिंह संधू , पोलीस अधीक्षक, , तसेच मा. श्री. विक्रम साळी अपर पोलीस अधीक्षक,यांनी अवैध धंद्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत आदेश दिलेले होते. याप्रकरणी वाळू माफिया विरुद्ध कारवाई करण्यात आली.दिनांक २०/०७/२०२६ रोजी रात्री १२.३० वा. चे सुमारास मा. श्री. विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक, जालना यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, भोकरदन ते हसनाबाद रोडवर अवैध वाळु वाहतुक चालु असलेबाबतची खात्रीशिर माहिती मिळाल्याने कारवाई करण्याकरीता आदेशीत केल्याने पोलीस पथकाने पंचासह कारवाई करणेकामी मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी रवाना झाले.

दि. २०/०७/२०२६ रोजी प्रथम काही इसम हे हायवा वाळूने भरुन भोकरदन ते हसनाबाद जाणारे रोड कडुन येत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने गोसेगाव फाटा नजिक सापळा लाऊन पंचासह थांबुन राहिलो असता अंदाजे रात्री ०१.४० वा.चे सुमारास दोन हायवा येताना दिसले त्यांना हात देऊन थांबविले असता त्यात वाळु असल्याचे दिसुन आले. सदर वेळी पोलीस पथकाची चाहुल लागल्याने अंधाराचा फायदा घेवुन त्यातील हायवा वरील ड्रायव्हर पळून जाऊ लागताच पोलीस पथकाने दोन जणांना ताब्यात घेवुन त्यांना पोलीस पथक असल्याचे ओळख सांगुन विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नावे सांगीतले. त्यांचेकडे व सदर ठिकाणी मिळुन आलेल्या वाळूने भरलेल्या वाहन मिळाला माल १) २५,२५०००/- रु. किंमतीचा जु. वा. विना क्रमांकाचा कंपनीचा हायवा त्यात अंदाजे ५ ब्रास वाळु किं. अं. २) २३,२५०००/- रु. किंमतीचा जु.वा. विना क्रमांकाचा कंपनीचा हायवा त्यात अंदाजे ५ ब्रास वाळु अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या पथकाच्या पोलिसांनी कारवाई केली यावेळी सपोनि योगश खटकळ, पोकों/३३३ निखिल गायकवाड, पोकों/७४८ प्रताप सुदंडे, पोकों/ १३४६ सोमशेखर सुरवसे तसेच हसनाबाद पोलीस स्टेशनचे पोहेकों / १३११ चौधरी यांनी केली आहे.

# स्वर्गीय अजितदादा यांच्या जयंतीनिमित्त नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व मोफत चष्मे वाटप शिबिर -अरविंदराव चव्हाण

जालना। प्रतिनिधी

जालना-महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा विकासाभिमुख नेतृत्व स्व. अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्त जालना जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . दरवर्षी अजितदादा यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात नेत्र तपासणी , रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, रुग्णांना फळ वाटप , विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप असे विविध सामाजिक व लोकहिताचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत होते. त्यानुषंगाने या ही वर्षी स्व.मा.आ. बाजीराव पाटील चव्हाण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व श्री गणपती नेत्रालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त भव्य नेत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व चष्मे वाटप शिबिराचे उद्घाटक मराठवाड्याचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांची उपस्थिती राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश अल्पसंख्यांक सेल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष नाझेर काझी, भटक्या विमुक्त जाती जमाती सेल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

तसेच जालना शहर व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सेवा सप्ताह म्हणून अनेक सामाजिक व लोकोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात यावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी केले आहे.दिनांक २२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत जालना तालुक्यातील सदानंद महाराज मठ,धारकल्याण येथे भव्य नेत्र तपासणी शिबिर घेण्यात येणार असून जिल्ह्यातील गरजू व परिसरातील रूग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहनही राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांनी केले आहे.

यावेळी पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रदेश युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस धैर्यशील चव्हाण केले आहे.

# गावठाण हद्दीतील अतिक्रमण काढण्याची यमगरवाडी ग्रामस्थांची मागणी

बीड/प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील जातेगाव सर्कलमध्ये व जातेगाव ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या यमगरवाडीमधील रस्त्यावरील गावठाणच्या जमीनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असून यामुळे वाहतुकीला मोठी अडचण निर्माण होत असल्याची तक्रार यमगरवाडी ग्रामस्थांनी ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय जातेगाव यांच्याकडे निवेदनाद्वारे ग्रामस्थांनी केली असून हे अतिक्रमण न काढल्यास यमगरवाडी वाद होण्याचे चिन्ह नाकारता येत नाही.

जातेगाव सर्कलअंतर्गत येणाऱ्या यमगरवाडी या गावामधील रस्त्याच्या कडेला असणाऱ्या गावठाण जमीनीवर मोठ्या प्रमाणावर अतिकृमण करण्यात आलेले असल्याने यामुळे वाहतुकीलाही मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होत आहेत. तसेच गावठाण जमीनीवर झालेल्या अतिक्रमणामुळे गावातील नागरिकांमध्ये छोटे मोठे वात सध्या होत असून भविष्यात मोठे वाद हाण्याचे चित्र नाकारता येत नाही. त्याच अनुषंगाने यमगरवाडी ग्रामस्थांनी जातेगाव ग्रामपंचायतला हे अतिक्रमण काढण्यासाठी रितसर निवेदन सादर केले असून हे अतिक्रमण काढले नाही तर अमरण उपोषण करणार असल्याचेही निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहे. दिलेल्या निवेदनावर देवराव यमगर, प्रकाश चोरमले, रघुनाथ यमगर, दत्ता पांढरे, बाळू यमगर, नवनाथ यमगर, श्रीराम चोरमले, अशोक चोरमले, नारायण यमगर,अर्जुन पाडुळे, किसन यमगर, मच्छिंद्र यमगर, नवनाथ यमगर, रंगनाथ करे, किसन पांढरे, हनुमान यमगर, भाउसाहेब यमगर, सुग्रीव यमगर, नवनाथ यमगर, शरद यमगर, विजय चोरमले सह आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या असून हे अतिक्रमण लवकर न काढल्यास ग्रामस्थ अमरण उपोषण करणार असून होणाऱ्या अवचित प्रकारास ग्रामपंचायत कार्यालय जातेगाव जबाबदार राहिल.

# कारमधून पळालेल्या जमीरने आणले मेफेड्रोन

अहिल्यानगर। प्रतिनिधी

मिस्कीन मळा येथे तोफखाना पोलिसांनी पकडलेले ३१ लाख रुपयांचे १५४ ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) कारमधून पळालेल्या जमीर निसार शेख (रा. मुकुंदनगर) याने आणल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणी जिशान सय्यद, रिहान शेख (दोघे रा. मुकुंदनगर) आणि वसिम बागवान (रा. पिंजारगल्ली) अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. तर जमीरसह आणखी एक पसार झाला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या कारवाईनंतर गेल्या काही महिन्यांपासून मुकुंदनगरसह शहरात मुंब्रा व पुणे जिल्ह्यातून मेफेड्रोनचा होणारा पुरवठा चर्चेत आला आहे. तोफखाना पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालात स्विफ्ट कारसह खेळण्यातील पिस्तूल, चाकू, मास्क, हातमोजे व इतर साहित्य आढळले. यात चिकट पट्टी व दोरीही आढळून आल्याने पकडलेले आरोपी दरोडा टाकण्यासाठी किंवा एखाद्याचे अपहरण करण्यासाठी जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्यादृष्टीने पोलिसांकडून तपास सुरू आहे. पसार झालेल्या जमीर यानेच सदरचे मेफेड्रोन आणले होते व ते गाडीत ठेवले होते, असे अटकेतील आरोपींनी तपासात सांगितले आहे. त्यामुळे ड्रग्ज तस्करांच्या संपूर्ण साखळीचा छडा लावणार अहिल्यानगर जिल्ह्यात या मेफेड्रॉन ड्रग्जचा पुरवठा कोठून होतो आणि स्थानिक पातळीवर त्याचे वितरण कोणामार्फत केले जाते, या संपूर्ण साखळीचा शोध घेऊन ती उखडून काढण्यात येणार आहे. तसेच या गुन्ह्यात पसार झालेल्या जमीर शेख व अन्य एका अज्ञात आरोपीच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत. जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधातील कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे.

# १६ लाख पशुधनासाठी मिळणार ४.६५ लाख मे.टन हिरवा चारा

## चारा टंचाई टाळण्यासाठी ८ हजार ७६१ हेक्टरवर चारा पिके

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्ह्यात सुमारे १६ लाख पशुधन असून दैनंदिन दूध उत्पादन सुमारे ४२ लाख लिटरवर आहे. जिल्ह्याच्याअर्थकारण ात पशुधनाचा मोठा वाटा आहे. परंतू, एलनिनो इफेक्ट व संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभाग सतर्क झाला आहे. ४ लाख ६५ मेट्रिक टन चारा उत्पादनासाठी १ हजार ९५३ क्विंटल चारा बियाणांचे वाटप करण्यात आले आहे.संभाव्य चारा टंचाई टाळण्याच्या उद्देशाने पशुसंवर्धन विभागाने यंदा चारा विकासाचे नियोजन हाती घेतले असून आतापर्यंत ८ हजार ६६१ हेक्टर क्षेत्रावर विविध चारा पिकांची पेरणी करण्यात आली आहे. या पेरणीतून सुमारे ४ लाख ६५ हजार मेट्रिक टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन अपेक्षित असल्याने दुष्काळी परिस्थितीत पशुपालकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.



यंदा एलनिनोच्या पार्श्वभूमीवर पावसाचे मोठे खंड पडत असल्याने चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता गृहीत धरून पशुसंवर्धन विभागाने हंगामाच्या सुरुवातीलाच नियोजन केले. त्यानुसार जिल्ह्यात मका, ज्वारी या चारा पिकांच्या पेरणीसाठी बियाणांचे वाटप केले. पावसाची अनिश्चितता कायम असली तरी वेळेत केलेल्या पेरणीमुळे आगामी महिन्यांत पशुधनासाठी हिरवा चारा उपलब्ध होण्याचा विश्वास विभागाने व्यक्त केला आहे.

जिल्ह्यातील पशुधनाची संख्या मोठी असंल्याने दरवर्षी चाऱ्याची मागणी वाढते. त्यातच पावसातील खंडामुळे नैसर्गिक कुरणांवरील चाऱ्याचे उत्पादन घटण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन चारा विकास कार्यक्रमाला प्राधान्य देण्यात आले आहे. पुढील काळात पावसाची स्थिती लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार अतिरिक्त उपाययोजनाही करण्यात येणार असल्याचे पशुसंवर्धन विभागाने स्पष्ट केले आहे. डी.डी. दिघे, पशुसंवर्धन अधिकारी. मूरघास हा टिकाऊ अन्? सकस आहार जिल्ह्यातील १६ लाख पशुधनासाठी चारा उपलब्ध होणे आवश्यक आहे. यापार्श्वभूमीवर खरिपाच्या पेरणीसाठी बियाणे वाटप करण्यात आले. संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध चाऱ्याचे मूरघासात रुपांतर करावे. हा चारा टिकतो, आणि जनावरांनाही सकस आहार मिळतो. जे बियाणे उपलब्ध झाले, ते यंदाच पेरावे कारण भविष्यात उगवन क्षमता कमी होण्याची शक्यता असते.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा बँकेचे अध्यक्षपद शिवसेनेला

## विलास भुमरे अध्यक्ष, भाजपचे रामराव शेळके उपाध्यक्ष; दोन वर्षांसाठी फॉर्म्युला निश्चित

संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदी आमदार विलास भुमरे यांची निवड झाली आहे, तर उपाध्यक्षपदी रामराव शेळके यांची निवड झाली आहे. अध्यक्षपदासाठी शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात दोन-दोन-एक वर्षांचा फॉर्म्युला निश्चित करण्यात आला आहे. खासदार संदिपान भुमरे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यानुसार, पहिल्या दोन वर्षांसाठी शिवसेनेला अध्यक्षपद मिळाले आहे. पुढील दोन वर्षे भाजप आणि शेवटच्या एका वर्षासाठी राष्ट्रवादी काँग्रेसला हे पद मिळेल.

अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी सोमवारी जिल्हा मध्यवर्ती बँकेत बैठक झाली. या बैठकीला सर्व संचालक उपस्थित होते. खासदार संदिपान भुमरे, ओबीसी विकास मंत्री अतुल सावे आणि आमदार अब्दुल सत्तार यांनी यावेळी अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या निवडीची घोषणा केली. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदासाठी जोरदार चर्चा सुरू होती. दोन्ही पक्षांनी हे पद आपल्याकडे घेण्यासाठी अनेक बैठका घेतल्या होत्या. अखेर शिवसेनेला अध्यक्षपद मिळाले असून, भाजपला उपाध्यक्षपद मिळाले आहे.शिंदेसेनेला २०२६ व २०२७ याकालावधीत अध्यक्षपद दिले आहे. २०२९ मध्ये लोकसभा, विधानसभा निवडणुका होणारआहेत. त्यामुळे अध्यक्षपदाचे चौथे वर्ष महत्त्वाचे ठरणार आहे. विशेष: लोकसभा मतदारसंघावर बँकेच्या अध्यक्षांचा प्रभाव असतो. त्यामुळे निवडणुकीवेळी अध्यक्षपदी आपल्याकडे राहिले पाहिजे, यासाठी भाजपचा प्रयत्न राहणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेची सूत्रे खासदार संदिपान भुमरे यांच्याकडे दिली होती.

# नोकरीच्या रांगेत उभे राहू नका; शेतीतून रोजगार निर्माण करा-प्रा.प्रविण मुळे

## आधुनिक कृषी उद्योजकतेचा प्रभावी संदेश; तरुणांनी शेतीकडे नव्या दृष्टीने पाहण्याचे आवाहन

पिंपळवंडी । प्रतिनिधी

भारत कृषिप्रधान देश असला, तरी आजचा तरुण शेतीपासून दूर जात आहे. कारण शेतीत संधी नाही म्हणून नव्हे,तर शेतीकडे उद्योग म्हणून पाहण्याची मानसिकता विकसित झालेली नाही.नोकरी ही जीवनाचा एक मार्ग असू शकते;पण नियोजनबद्ध, तंत्रज्ञानाधारित आणि बाजारपेठाभिमुख शेती अनेक कुटुंबांचे भविष्य बदलू शकते, असा प्रभावी संदेश एका प्रेरणादायी व्याख्यानातून देण्यात आला.



व्याख्यानादरम्यान उपस्थित युवक, शेतकरी आणि पालकांना उद्देशून वक्त्यांनी सांगितले की, प्रत्येक विद्यार्थ्याला सरकारी किंवा खासगी नोकरी मिळेल,अशी कोणतीही हमी नाही. त्यामुळे शिक्षणाबरोबरच शेती आणि कृषी उद्योजकता हा पर्याय सक्षमपणे स्वीकारण्याची मानसिकता निर्माण करणे आवश्यक आहे.आधुनिक शेती ही केवळ पिके घेण्यापुरती मर्यादित नसून,ती विज्ञान, संशोधन,तंत्रज्ञान,व्यवस्थापन आणि विपणन यांचा संगम आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी एकाच पिकावर अवलंबून न राहता एकात्मिक शेती पद्धती



स्वीकारावी,असे आवाहन करण्यात आले.एका एकरातील आंबा फळबागेसोबत शेळीपालन, कुक्कुटपालन,मधमाशी पालन, भाजीपाला,गांडूळ खत,अझोला, मत्स्यपालन आणि कृषी प्रक्रिया उद्योग उभारल्यास वर्षभर विविध उत्पन्नाचे स्रोत निर्माण होतात. अशा पद्धतीने जोखीम कमी होत असून नियमित आर्थिक स्थैर्य मिळू शकते,असेही त्यांनी सांगितले.

व्याख्यानातील विशेष आकर्षण म्हणजे शेतीला व्यवसाय नव्हे, ब्रँड बनवा हा विचार होता. स्वतःच्या शेतमालाचे पॅकिंग, प्रक्रिया,ब्रँडिंग आणि थेट ग्राहकांपर्यंत विक्री केल्यास शेतकऱ्यांचा नफा मोठ्या प्रमाणात वाढू शकतो.सोशल मीडिया, डिजिटल मार्केटिंग, ई-कॉमर्स आणि थेट ग्राहक संपर्क ही आजच्या काळातील शेतीची नवी ताकद असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

तरुण पिढीला शेतीची आवड निर्माण करण्यासाठी त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे, आधुनिक यंत्रसामग्री,ड्रोन,कृत्रिम बुद्धिमत्ता,हवामान अंदाज,मृदा परीक्षण,ठिबक सिंचन आणि सौरऊर्जा यांसारख्या तंत्रज्ञानाशी जोडणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

हवामान बदल,पाण्याची टंचाई आणि वाढता उत्पादन खर्च या आव्हानांचा उल्लेख करताना जलसंधारण,सेंद्रिय शेती, मूल्यवर्धन,कृषी पर्यटन आणि शाश्वत शेती यांवर भर देण्यात आला.शेती वाचली तर गाव वाचेल,गाव वाचले तर देश समृद्ध होईल,हा संदेश उपस्थितांच्या मनाला भिडला.

व्याख्यानाचा शेवट अत्यंत प्रेरणादायी शब्दांत करण्यात आला. ज्यांच्या हातात मोबाईल आहे, त्याच हातात शेतीचे भविष्य घडवण्याची ताकद आहे.आजचा तरुण जर विज्ञान,संशोधन आणि नवकल्पना यांची सांगड मातीत घालेल,तर भारत पुन्हा जगाला अन्न,रोजगार आणि समृद्धीचा मार्ग दाखवू शकेल.नोकरी मागणारे नव्हे,तर रोजगार निर्माण करणारे कृषी उद्योजक घडवणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

या व्याख्यानाला उपस्थित युवक, शेतकरी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत,अशा विचारप्रवर्तक व्याख्यानांची गावागावांत गरज असल्याचे मत व्यक्त केले.

# दिल्लीमध्ये विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ ‘वंचित’ची महाराष्ट्र बंदची हाक

## बीडमधील व्यापारी व नागरिकांना सहकार्याचे आवाहन - अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट (छएएढ) परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींवर झालेल्या पोलिस लाठीचार्जचा तीव्र निषेध करत वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे.

या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी भेट दिल्यानंतर देशभरातील विविध नेत्यांचे लक्ष या आंदोलनाकडे वेधले जात असतानाच, शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेली कारवाई ही लोकशाहीवरील आघात असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. पक्षाच्या म्हणण्यानुसार, विद्यार्थ्यांच्या आवाजाला दडपण्यासाठी पोलिस प्रशासनाचा वापर करण्यात आला असून, शांततापूर्ण आंदोलनावर करण्यात आलेला लाठीचार्ज हा अत्यंत निषेधार्ह आहे. विद्यार्थ्यांवरील या कारवाईमुळे देशभरात संतापाची लाट निर्माण झाली असून, या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे. यासंदर्भात वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक, छोटे-मोठे व्यावसायिक तसेच सर्व नागरिकांना आवाहन करत म्हटले आहे की, आजचा लढा केवळ विद्यार्थ्यांचा नाही, तर देशाच्या उज्ज्वल भविष्याचा आहे. आपल्या उच्चशिक्षित लेकरांच्या भविष्याचे रक्षण करण्यासाठी महाराष्ट्र बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद द्या आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी सहकार्य करा.विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध, शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकतेची मागणी आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी महाराष्ट्रातील नागरिकांनी एकजुटीने उभे राहावे, असे आवाहनही वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

# वांगचुक यांच्यावरील कारवाईच्या निषेधार्थ अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जोरदार धरणे आंदोलन

बीड । प्रतिनिधी

सुप्रसिद्ध शिक्षण-पर्यावरणतज्ञ, संशोधक सोनम वांगचुक व विद्यार्थी-विद्यार्थिनींचे जंतरमंतर वरील लोकशाही पद्धतीने, शांततामय मार्गाने चालू असलेले आंदोलन पोलीसी बळाचा वापर करुन, असंवैधानिक रितीने लोकशाहीचे वस्त्रहरण करत त्यांना कट करुन ’उचलणे’ व आंदोलकांवर हुकूमशाहीचा नंगानाच करत लाठी चार्ज केल्याबद्दल महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती,बीड शाखेने व महाराष्ट्र राज्य विवेकवाहिनीच्या राज्य प्रमुख प्राचार्य डॉ. सविता शेटे व




मअंनिसचे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य कॉ. डी.जी.तांदळे यांच्या नेतृत्वाखाली विविध संघटनां-पक्षांचे प्रमुख ,कार्यकर्ते यांनी तीव्र शब्दांत शासनाचा धिक्कार करुन निषेध नोंदवला असल्याची माहिती प्रसिद्धी प्रमुख डॉ संजय तांदळे यांनी दिली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ’निदर्शने’ आंदोलन करताना संतप्त निदर्शकांच्या ’तानाशाही नही चलेगी’, ’मोदी सरकार मुर्दाबाद’, ’सोनम वांगचुक जिन्दाबाद’, ’शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्या’ ,’ सर्वोच्च परीक्षा घोटाळेबाज प्रदिप जोशी यांचा राजिनामा घ्या’, ’शिक्षण आमच्या हक्काचे’ विवेकचा आवाज बुलंद हो’,या व इतर घोषणांनी परिसर दणाणून गेला.

सोनम वांगचुक यांच्या शिक्षण,परीक्षा संबंधीच्या मागण्या शासनाने विनाविलंब मान्य करुन ,त्यांच्या व सहकारी युवक युवतींच्या आरोग्याची- जिवीताची देशाला हमी द्यावी.तद्वतच,त्यांची पत्नी गीतांजलींच्या मागणीप्रमाणे सोनम वांगचुक यांच्यावरील दवाखान्यातील उपचार,अहवाल व इतर मागण्या तत्काळ अंमलात आणाव्यात ; अशा आशयाचे निवेदन देशाच्या राष्ट्रपती द्रोपदी पान ३ वर

# लिंबागणेश येथील पाणंद रस्ता तातडीने खुला करा; तहसीलदारांना ग्रामस्थांचे लेखी निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत हद्दीतील प्राथमिक आरोग्य केंद्र ते संगीत विद्यालय भाग १ व भाग २ या पाणंद रस्त्याचे काम सुरू असताना मालकीहक्काच्या जमिनीच्या वादामुळे रस्त्याचे काम अडविण्यात आले आहे. यामुळे परिसरातील शेकडो नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, रस्ता तातडीने खुला करून देण्याची मागणी तहसीलदार चंद्रकांत शेळके




यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या संदर्भात ग्रामस्थांनी परस्पर चर्चा करून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र तो निष्फळ ठरल्यानंतर सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटीचे चेअरमन रविबापू निर्मळ , कैलास काटे व डॉ . गणेश ढवळे यांनी तहसीलदारांना पान ३ वर




## मुख्य रस्त्यावरील डीपी अखेर हटवली

बीड । प्रतिनिधी

शहरातील तुळजाई चौक ते पंचशील नगर मार्गावरील मुख्य रस्त्यावरील डीपी अखेर हटविण्यात आली

बीड नगर परिषदेच्या वॉर्ड क्रमांक १३ मधील तुळजाई चौक ते पंचशील पान ३ वर

# स्वातंत्र्यानंतर प्रथमच बेदरवाडीत एसटी बसचे आगमन; ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांकडून उत्साहात स्वागत

पाटोदा । प्रतिनिधी

स्वातंत्र्यानंतर प्रथमच बेदरवाडी गावात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) बस सेवा सुरू झाल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ’पाटोदा - बेदरवाडी - निरगुडी - बीड’ या नवीन बसफेरीचा शुभारंभ होताच गावकऱ्यांनी आणि शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींनी बसचे उत्साहात स्वागत केले.

नवीन बसफेरीच्या प्रारंभानिमित्त ग्रामस्थांनी एसटी बसची विधिवत पूजा करून




पुष्पहार अर्पण करत जल्लोषात स्वागत केले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली दळणवळणाची मागणी पूर्ण झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

या बसफेरीमुळे जवाहर विद्यालय, निरगुडी येथे शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या प्रवासाचा मोठा प्रश्न सुटला आहे. शालेय वेळेनुसार बससेवा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांनी पान ३ वर

# तारकेश्वर गडावर मानवी मनोऱ्यातून मुख्यमंत्र्यांना अनोख्या पद्धतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा!

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश (अण्णा) धस यांच्या वतीने तारकेश्वर गड येथे आगळावेगळ्या पद्धतीने वाढदिवस साजरा करण्यात आला. गोशाळेतील गाईंचे विधिवत पूजन करून कार्यकर्त्यांनी मानवी मनोऱ्याची साखळी तयार करत Happy Birthday Devabhau



असा संदेश साकारला. या अनोख्या उपक्रमाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र विकासाच्या नव्या पर्वाकडे वाटचाल करत असल्याचे सांगितले. राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजना, पायाभूत सुविधांचा वेगाने होत असलेला विकास आणि सर्वसमावेशक प्रशासनामुळे महाराष्ट्र प्रगतीच्या दिशेने सक्षमपणे पुढे जात असल्याचे त्यांनी नमूद केले. पान ३ वर

# जंतर-मंतर वरील आंदोलकांवर झालेल्या लाठीचार्ज निषेधार्थ माजलगावमध्ये आज विराट मोर्चा

माजलगाव । प्रतिनिधी

दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा तसेच आंदोलनकर्त्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ आज दि. २२ जुलै बुधवार रोजी माजलगाव येथे विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे तरी या विराट मोर्चात विद्यार्थी,पालक व लोकशाहीवादी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सर्व विरोधी पक्षांच्या वतीने करण्यात आले आहे.

यासंदर्भात सर्व विरोधी पक्षाच्या वतीने दि २० जुलै सोमवार रोजी शहरातील हॉटेल व्यंकटेश येथे सर्व




विरोधी पक्षाच्या वतीने दिल्ली येथील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी बैठक घेण्यात आली.बैठकीनंतर सर्व विरोधी पक्षांच्या वतीने तहसीलदार व पोलीसांनी दिलेल्या निवेदनात असे नमूद केले आहे की हे आंदोलन स्पर्धा परीक्षा व प्रवेश प्रक्रियेत वारंवार निर्माण होणारा गोंधळ,निट,टि. ई.टी परीक्षेतील पेपरफुटीप्रकरणानंतर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता, पारदर्शक भरती प्रक्रियेची मागणी, तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर शासनाने ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी करत याप्रश्नी आज दि २२ जुलै बुधवार रोजी सकाळी ११:०० वाजता सुंदरराव सोळंके महाविद्यालय ते डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून या विराट मोर्चात विद्यार्थी, पालक व लोकशाहीवादी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सर्व विरोधी पक्षांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अनंतअप्पा जुजगर यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील वीरशैव लिंगायत कोष्टी समाजातील ज्येष्ठ नागरिक तथा समाजकार्याबद्दल ओळख असलेले अनंतअप्पा (बाप्पा) जुजगर यांचे आज, मंगळवार दि.२१ जुलै रोजी सकाळी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते.



अनंतअप्पा जुजगर हे परळी उपजिल्हा रुग्णालयातील सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी पुरुषोत्तम जुजगर यांचे वडील होत. धार्मिक, सामाजिक आणि समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये ते नेहमी सक्रिय सहभाग घेत असत. अत्यंत मनमिळाऊ, प्रेमळ व सर्वांना आपलेसे करणारा त्यांचा स्वभाव असल्याने ते माजलगाव परिसरात सर्वपरिचित होते. बाप्पा या नावाने त्यांची विशेष ओळख होती.

त्यांच्या निधनाने वीरशैव लिंगायत कोष्टी समाजासह माजलगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, दोन भाऊ तसेच नातवंडे व असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार माजलगाव येथे शोकाकुल वातावरणात करण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल विविध स्तरांतून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

# युसूफवडगांवमध्ये जिओ नेटवर्कचा वारंवार खोळंबा

## टॉवर असूनही नेटवर्कची समस्या; नागरिक त्रस्त

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव व परिसरात जिओचे नेटवर्क वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. गावात जिओचे टॉवर असूनही नेटवर्कमध्ये सातत्याने अडथळे निर्माण होत असल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

युसूफवडगांवसह परिसरातील अनेक गावांमध्ये मोठ्या संख्येने नागरिक जिओचे ग्राहक आहेत. ग्राहकांच्या सोयीसाठी गावात जिओचा टॉवर उभारण्यात आला आहे. मात्र, मागील काही दिवसांपासून नेटवर्क वारंवार गायब होणे, कॉल न लागणे, कॉल ड्रॉप होणे तसेच इंटरनेट सेवा अत्यंत संथ होणे, अशा समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.

नेटवर्कअभावी नागरिकांचे दैनंदिन व्यवहार, ऑनलाइन कामे, डिजिटल व्यवहार, शासकीय कामकाज तसेच विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन अभ्यासावरही परिणाम होत आहे. विशेष म्हणजे नेटवर्कची समस्या उद्भवल्यानंतर तक्रार नेमकी कुठे आणि कशी करावी, याबाबतही अनेक नागरिकांना माहिती नसल्याने समस्या आणखी गंभीर बनली आहे. ‘धरण उशाला आणि कोरड घशाला’ या म्हणीप्रमाणे गावात जिओचा टॉवर असूनही नेटवर्कच्या समस्येमुळे नागरिकांची अवस्था झाली आहे. जिओ कंपनीने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन नेटवर्कमधील तांत्रिक अडचणी तातडीने दूर कराव्यात आणि ग्राहकांना सुरळीत सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी युसूफवडगांव व परिसरातील नागरिकांतून होत आहे.

# नीट परीक्षेत ज्ञानेश्वर पडवळे’चे उज्वल यश

बीड । प्रतिनिधी

**केंद्रप्रमुख सारूक यांनी केला सत्कार**

केज तालुक्यातील विडा केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काचरवाडी या अतिशय दुर्गम, डोंगराळ भागातील माजी विद्यार्थी ज्ञानेश्वर दादाराव पडवळे या नीट २०२६ मध्ये ५९० गुण मिळवून उज्वल यश संपादन केले.

विडा केंद्राचे केंद्रप्रमुख सुभाष सारुक यांनी विद्यार्थी ज्ञानेश्वर व त्याचे वडील यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. सदर विद्यार्थ्याचे आई -वडिल ऊसतोडणीचे काम करतात. ज्ञानेश्वरचे प्राथमिक शिक्षण जि.प.शाळा काचरवाडी येथे झालेल आहे. जिल्हा परिषदेचे विद्यार्थीही विविध क्षेत्रात विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात नावलौकिक केला आहे. हे ज्ञानेश्वरच्या यशावरून दिसून येते. विडा केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून ज्ञानेश्वरच्या गावी जावून सत्कार करून कौतुक केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26